शिक्षण

सद्यस्थिती आणि पर्याय

आकाश साबळे



शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

दोन शब्द

"शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा डॉ. आंबेडकरांनी दिलेला युगमंत्र. शोषणाबाबत 'बहिष्कृत भारत'च्या (१ जुलै १९२७) अग्रलेखात ते म्हणतात, "आमच्या मते आंग्लाई व ब्राह्मणाई या हिंदी जनतेच्या अंगाला लागलेल्या दोन जळवा आहेत व त्या एकसारख्या हिंदू लोकांच्या रक्ताचा शोष करीत आहेत. आंग्लाई सत्तेने लोकांना देहाने गुलाम बनविले, तर ब्राह्मणाईने जनतेच्या आत्म्याला गुलाम करून ठेविले. आंग्लाईने हिंदुस्थानातील संपत्तीचे शोषण केले तर ब्राह्मणाईने स्वाभिमानासारख्या आत्मिक संपत्तीचे हरण केले आहे."

मनमाडमध्ये दलित रेल्वे कामगारांच्या परिषदेत (फेब्रुवारी १९३८) डॉ. आंबेडकर मांडतात की, माझ्या मते या देशाच्या कामगारांपुढे दोन शत्रूंशी मुकाबला करण्याचे आवाहन आहे - ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही. ब्राह्मणशाही म्हणजे ब्राह्मण समाजाच्या हाती एकटलेली सत्ता, प्रतिष्ठा नव्हे तर 'स्वातंत्र्य, समता, बंधुता' ही मूलतत्त्वे नाकारणे. हा नकार केवळ ब्राह्मणच देतात असे नाही तर सर्व वर्गांमध्ये ही मनोभूमिका फैलावलेली आहे.

बाबासाहेबांनी आवाहन केल्यानुसार ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही विरोधात आपण संघटित होत आहोत का? नाही. उलट अनेक दलित शिकले की ब्राह्मण बनत आहेत. आत्ममग्न होत आहेत. काही दलित पुढारी तर भांडवली पक्षाच्या वळचणीला, सत्तेचे तुकडे मिळवण्यासाठी धडपडत आहेत, असे का घडते आहे? बुद्ध, फुले, बाबासाहेब यांचे विचार आपण आत्मसात का करू शकत नाही? बाबासाहेबांनी शिक्षणासाठी केलेले अथक प्रयत्न हवे तसे फलद्रुप का होत नाहीत? खरे तर, शिक्षणातून समता, स्वाभिमान, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा व सामाजिक बांधिलकी ही मूल्ये रुजायला हवीत.

"शिक्षण हे वाघिणीचे दूध" बहुजनांना मिळावे यासाठी बाबासाहेबांनी ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. २० जून १९४६ रोजी मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालय आणि जून १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन केले. महाराष्ट्रातील खेडोपाडीच्या दलित समाजातील हजारो तरुण-तरुणींनी या महाविद्यालयांतून

शिक्षण घेतले. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. परंतु भारतातील सामाजिक बांधिलकी नसलेले दिशाहीन शिक्षण माणसाला स्वार्थी, कूपमंडूक व अहंकारी बनवू शकते. शिक्षण हे दुधारी हत्यार आहे. त्याचा उपयोग समाज विकासासाठी करायचा आहे याची जाण शिक्षणद्वाराच रुजवावयास हवी. परंतु भारतातील शिक्षणाच्या स्वरूपात स्वातंत्र्यानंतरही समानतापर व न्याय्य समाज उभारणीचा हेतू डोळ्यासमोर ठेवून बदल केलेले नाहीत. त्यामुळे शालेय शिक्षणाद्वारा 'खरे शिक्षण' मिळू शकत नाही.

ब्रिटिशांनी भारतामध्ये आधुनिक शिक्षण सुरू केले. माध्यमिक व उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्यामुळे बहुजनसमाज बहुशः आधुनिक शिक्षणापासून वंचितच राहिला. स्वातंत्र्यानंतर शिक्षण प्रसार वाढवला. पण शिक्षणाचे स्वरूप ब्रिटिश काळात होते, तसेच गुलामी वृत्तीचा कामगार व कारकून पैदास करणे असेच राहिले. हडेलपट्टी करून लादलेले नीरस व घोकंपट्टीचे, जीवनापासून तुटलेले उपरे शिक्षण मुलांची उपजत जिज्ञासा, सर्जनशीलता, मानवी ऊर्मीच मारते. त्यामुळे तथाकथित शिक्षित समाज हा दुबळा, लाचार, अगतिक, वैफल्यग्रस्त बनून प्रवाहपतित होतो. बाबासाहेबांच्या आवाहनानुसार संघटित होऊन संघर्ष करण्याच्या क्षमता शिक्षणातून विकसित होत नाहीत. तेव्हा शिक्षणामध्ये मूलभूत बदल करण्यासाठी चळवळ हाती घेणे अगत्याचे आहे. या कळीच्या प्रश्नावर विचारविनिमय, चर्चा सुरू व्हावी यादृष्टीने प्रस्तुत पुस्तिकेमध्ये प्रकरण १ व २ मध्ये अनुक्रमे शिक्षणाचे माध्यम आणि शालेय शिक्षणाचे स्वरूप या प्रश्नांचा उहापोह केला आहे. आज असा गैरसमज घट्ट रुजला आहे की कोणतीही नोकरी मिळवायची असेल तर इंग्रजी फाडफाड बोलता आले पाहिजे. आपण शाळेत इंग्रजी शिकतो पण इंग्रजीत बोलण्याचे कधी कारण नसल्याने इंग्रजीत बोलता येत नाही. खरे तर महाराष्ट्रात अनेक उद्योग, व्यवसाय व नोकऱ्या आहेत की ज्यामध्ये विशिष्ट कसब किंवा शिक्षण लागते. इंग्रजी येण्याची गरजच नसते. अनेक नोकऱ्या अशा आहेत की ज्यात कामापुरते इंग्रजी वाचता येणे पुरेसे असते. विविध नोकऱ्या, व्यवसायांमध्ये इंग्रजी भाषेचे कोणत्या पातळीवरील कसब जरूर असते याची माहिती प्रकरण तीनमध्ये दिली आहे. आपणास जी नोकरी करावयाची असेल त्याला अनुरूप असे कसब अल्प काळात पैदा करणे शक्य असते. तेव्हा इंग्रजीचा बागोलबुवा उभा करण्याचे काही कारण नाही.

आपल्या प्रतिक्रिया मांडत, वाचक या महत्त्वाच्या प्रश्नांवरील चर्चेत सहभागी होतील अशा विश्वासाने ही पुस्तिका आपल्या हाती देत आहोत.

9890852778; akashsable08@gmail.com

आकाश साबळे, पुणे

१. इंग्रजीची गुलामी

कोणत्याही समाजातील औपचारिक शिक्षणव्यवस्था ही सत्ताधाऱ्यांचे आर्थिक-राजकीय हितसंबंध जोपसण्याच्या दृष्टीने बेतलेली असते. भारतामध्ये पारंपरिक श्रेणीबद्ध जातिव्यवस्थेमार्फत उच्चवर्णीयांखेरीज अन्य सर्व समाजाला म्हणजे शूद्र - अतिशूद्र जाती व सर्व वर्णातील स्त्रिया यांना ज्ञानबंदी होती. ज्ञान - पांडित्याची मक्तेदारी ब्राह्मणांकडे होती. ब्राह्मणांचे पांडित्य, प्रत्यक्ष काम व कार्यानुभव यापासून तोडलेले असल्याने भारतातील जातिव्यवस्थेची पकड जशी घट्ट झाली तशी विज्ञान - तंत्रज्ञानाची प्रगती खुंटली. ब्राह्मणादी उच्चवर्णीयांनी एकूण समाज अज्ञानी व अंधश्रद्ध ठेवून, कर्मकांडात बांधून, पुनर्जन्माच्या भाकड कथेत गुरफटून ठेवले. जन्माधिष्टित श्रेणीबद्ध जातिव्यवस्था निमूटपणे स्वीकारायला लावली व आपली सत्ता व ज्ञानावरील मक्तेदारी शतकानुशतके कायम ठेवली. ब्रिटिशांची सत्ता भारतावर स्थापन झाल्यावर या पारंपरिक व्यवस्थेला थोडेफार धक्के बसू लागले. गावगाडा खिळखिळा व्हायला लागला. गोदी, रेल्वे, लष्कर, गिरण्या येथे नोकऱ्या - मजुरीकाम मिळू लागल्यावर दलित व बहुजन काही प्रमाणात गाव सोडून नव्या गुलामीत - भांडवलाच्या गुलामीत अडकले. ब्रिटिशांनी भारतामध्ये शालेय शिक्षण सुरू केले ते निमूट कामगार, कारकून तयार करण्यासाठी.

भारतामध्ये ब्राह्मणी व्यवस्थेने इथल्या दलित, शोषित, बहुजन कष्टकरी, अदिवासी व स्त्रिया यांना विषमतावादी धर्मग्रंथाच्या जोखडात अडकवून ठेवले. त्यांना ज्ञानापासून पिढ्यानपिढ्या वंचित ठेवून हलक्या दर्जाची, जनावरांसारखी कामे लादली. उच्चवर्णीयांनी ज्ञानसत्ता, धर्मसत्ता व धनसत्ता याचा आधिकार स्वतःकडे ठेवून इथल्या दलित बहुजनांना माणूस म्हणून घेण्याचा आधिकार नाकारला. महात्मा जोतिराव फुले यांनी इथल्या शोषित कष्टकरी, दलित बहुजन जात - वर्गासाठी १८५१ साली शाळेची द्वारे खुली केली. तसेच राजर्षी शाहू महाराज, भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमामुळे दलित, बहुजन कष्टकरी व स्त्रियांचा थोड्या प्रमाणात शिक्षणक्षेत्रामध्ये शिरकाव होऊ शकला.

स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीय - उच्चवर्गीय राज्यकर्त्या वर्गाने ब्रिटिशकालीन चाकोरीबद्ध, समाजजीवनापासून तुटलेली, पुस्तकी, घोकंपट्टीवर भर देणारी, परीक्षार्थी शिक्षणपद्धतीच चालू ठेवली. इंग्रजीचे वर्चस्व कायम ठेवले. याचे कारण उच्चवर्गीय - उच्चवर्णीय यांचा प्रशासन, न्याय व्यवस्था, अध्यापन, वैद्यकी, वकिली, आदी व्यवसाय, उद्योगधंदे, व्यापार, सेवा आदी क्षेत्रातील आपले वर्चस्व कायम राखण्याचा डाव ! स्वभाषेचा सार्वत्रिक स्वीकार केला असता तर शिक्षणाच्या प्रसाराबरोबर बहुजन समाजातील मुलांच्या स्पर्धेला उच्चवर्णीयांना तोंड द्यावे लागले असते. म्हणून उच्चवर्णीयांनी इंग्रजी भाषेचे वर्चस्व कायम ठेवले आहे. भारतातील उच्चस्थानांवरील मक्तेदारी (राखीव जागा सोडून) कायम ठेवली आणि त्याचबरोबर काही प्रमाणात इंग्लंड - अमेरिकेत स्थलांतर करत आपली अस्मिता अमेरिकी जीवन व इंग्रजी भाषा यांच्याशी जोडली. जागतिकीकरण पर्वात तर उच्चवर्णीय, उच्चवर्गीय हे अमेरिकेचे हस्तक बनून इंग्रजी भाषा व अमेरिकी पैसाकेंद्री चंगळवादाचा पगडा समाज मानसावर बसवण्याचे काम करत आहेत.

इंग्रजीचा उदोउदो : उच्चवर्णीय - वर्गीयांचे अनुकरण करत बहुजन समाजाचे अनेक नेतेही इंग्रजी माध्यम डोक्यावर घेत आहेत. इंग्रजीमध्ये बोलणे आणि त्यासाठी बालवाडीपासून इंग्रजी माध्यमातून शिक्षण हे समीकरण त्यांनी आपल्या 'मुक्ती'चे समीकरण बनवले आहे. स्पर्धेत पुढे जाण्यासाठी बहुजन समाजाने अभिजनांचे अनुकरण करू पाहाणे अनिवार्य आहे, अशी भूमिका घेऊन ते इंग्रजी माध्यमाची भलावण करीत आहेत. मराठी ही ब्राह्मणांची म्हणजे जातिबद्ध समाजातील असमानतेची भाषा म्हणून नाकारण्यात येत आहे. परंतु इंग्रजी ही तर साम्राज्यशाहांची म्हणजे विषमता वाढवणारी भाषा आहे, साऱ्या जगाची लूट करून कष्टकरी वर्गाला गुलाम बनवणारी आहे, जगातील बहुविध भाषा - संस्कृती नामशेष करणारी भाषा आहे, याकडे दुर्लक्ष केले जात आहे. उच्चवर्णीय - वर्गीयांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण जमते मग सर्वांना का नाही जमणार असा प्रश्न उपस्थित केला जातो. तेव्हा भारतीय समाजातील सामाजिक - आर्थिक पातळीवरील अत्यंतिक विषमता विसरली जाते. आज भारतामध्ये भरपूर नफा कमावणाऱ्या इंग्लिश माध्यमांच्या परकीय शाळांना जोडलेल्या "इंटरनॅशनल स्कूलस्", स्थानिक तथाकथित 'इंटरनॅशनल' शाळा, उच्चभ्रू खाजगी इंग्रजी शाळा व सुमार दर्जाच्या इंग्रजी शाळा आणि इंग्रजी भाषा संभाषण वर्ग (क्लास) यातून एका बाजूला इंग्रजीचे महागडे, चांगल्या दर्जाचे शिक्षण घेतलेला उच्चवर्गीय, उच्चवर्णीय तर दुसऱ्या बाजूला इंग्रजीचे

कमी दर्जाचे व अपुरे शिक्षण घेतल्यामुळे इंग्रजीचे अर्धवट ज्ञान असलेला व इंग्लिश माध्यमामुळे शिक्षणाचा एकूणच खेळखंडोबा झालेला बहुजन समाज अशी नवी चातुर्वर्ण्य व्यवस्था निर्माण केली जात आहे. असाही भ्रम आहे की इंग्रजी शिकल्यामुळे ब्राह्मण उच्चस्थाने पटकावतात. पददलित इंग्रजी माध्यमाकडे वळल्यावर मात्र 'मराठी वाचवा' असा डांगोरा पिटत मराठी माध्यम समुचित कसे आहे असा युक्तिवाद करत पददलितांना मराठीच्या खोड्यात आडकवू पाहात आहेत. हा 'ब्राह्मणी कावा' ओळखला पाहिजे, असा दावा करत बालवाडीपासून इंग्रजी माध्यमच हवे असा आग्रह धरत आहेत. **खरे तर इंग्रजी माध्यमाचे स्तोम माजवून बहुजनांना फसवणे हा 'ब्राह्मणी कावा' आहे.** त्यासाठी अमेरिकन, गोऱ्या साहेबाची इंग्रजी भाषा ही 'जागतिक ज्ञानभाषा' आहे असा भ्रम अभिजनांनी जनतेत भिनवला आहे. हा दावा सपशेल खोटा आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, तत्त्वज्ञान आदी विविध ज्ञानशाखांमध्ये जगात आघाडीवर असलेल्या चीन, (जगाच्या सात अब्ज लोकसंख्येतील २० टक्के लोकसंख्या) जपान, रशिया, जर्मनी, फ्रान्स आदी सर्व देशांमध्ये त्या त्या देशांच्या स्वकीय भाषांमधूनच बालवाडीपासून विद्यापीठ अखेरचे सर्व शिक्षण, शास्त्रीय प्रगती व राज्य - अर्थ व्यवहार चालतात. या सर्वांची स्वभाषा हीच ज्ञानभाषा आहे, इंग्रजी नव्हे. इंग्रजी ही जगाच्या लोकसंख्येतील फक्त सहा टक्के लोकांची मातृभाषा म्हणजे ज्ञानभाषा आहे.

राज्यकर्ते मात्र जगाच्या ज्ञानभाषेतून - इंग्रजी भाषेच्या माध्यमातून आम जनतेला शिक्षण देत आहोत असा बहाणा करत आहेत. राज्यकर्ता वर्ग जाणून आहे की इंग्रजी ही पूर्णतया परकी, परिसरात नसलेली भाषा जर पहिल्या इयत्तेपासून शिक्षणाचे माध्यम म्हणून सार्वत्रिक वापरात आली तर सर्व मुलांना ती पेलणे कठीण आहे. शिवाय एवढ्या मोठ्या संख्येने इंग्रजी भाषा व सर्व विषय इंग्रजी भाषेतून शिकवणारे शिक्षक उपलब्ध होणे अशक्य आहे. इंग्रजी माध्यमाच्या मृगजळामागे बहुजन समाज धावू लागला की त्यांना अर्धशिक्षित राखणे आणि स्पर्धेतून बाद करणे सोपे आहे. इंग्रजी माध्यम व प्रसार माध्यमे याद्वारा **अमेरिकी पैसाकेंद्री** चंगळवादाचे आकर्षण जनमानसात भिनवून विद्रोहाची ऊर्मी मारण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या अतिक्रमणाखाली मराठी माध्यमाच्या शाळा बंद पाडून व नवीन शाळा उघडण्यास परवानगी नाकारून शालेय शिक्षणासाठी शासन देत असलेले अर्थसाहाय्य शासनकर्ते कमी करत आहेत व आपली शिक्षणाबाबतची जबाबदारी झटकत आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळा खोलून घवघवीत शुल्क आकारून भरपूर नफा कमावता येतो. तेव्हा या धंद्यात उद्योगसमूह,

बिल्डर, साखर कारखाने, शिक्षण सम्राट, सत्ताधारी व त्यांचे सगेसोयरे उतरले आहेत. हा धंदा पूर्वप्राथमिक - नर्सरी, बालवाडीच्या टप्प्यावर विशेष फोफावत आहे. कोणीही ही दुकाने खोलावीत. त्यासाठी ना नियम, ना नियमन. इंग्रजीचा सराव बालपणापासून होईल अशा वेड्या आशेने भरमसाठ शुल्क भरून पालक मुलांना या पिंजऱ्यांत कोंडत आहेत. त्यामुळे पालकांची आर्थिक आणि मुलांची बौद्धिक, मानसिक पिळवणूक चालू आहे.

खऱ्या शिक्षणामुळे विचारक्षमता, आकलनशक्ती वाढते. जगाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी मिळते, आत्मविश्वास वाढतो, ज्ञाननिर्मितीची ताकद कमावता येते. परंतु आता 'कसा विचार करायचा' ही क्षमता वाढवण्याची शक्यताच शिक्षण व्यवस्थेतून बाद केली आहे व शिक्षण ही एक बाजारी वस्तू बनवली आहे. शिक्षण म्हणजे इंग्रजी भाषेत बोलणारे पोपट निर्माण करण्याचा कारखाना असे समीकरण प्रचलित होऊ लागले आहे.

आपण इंग्रजी माध्यमामागे धावत असल्याने काय घडते आहे याचा एक किस्सा : अथर्व धाडकन् दरवाजा उघडून घरात शिरला नि बाजेवर चढून ओरडला आजी "जंपू?". "अरे राजा बुटाचे पाय गादीवर?". धाडकन् प्रत्युत्तर, "स्टुपिड, यू". पण नातवाचे इंग्रजीतले बोल ऐकून आजीचा ऊर अभिमानाने भरून आला. घरोघरी हे असं चाललेय. त्यातून स्पष्ट दिसतेय की, आज मराठी जनता आपली मायबोली, अभंग-ओव्या, आपले आचार सोडून "साहेब" बनण्याचा ध्यास धरून आहे. बाळाचे पहिले बोल बाटले. आईची मम्मी झाली, बापाचा पप्पा ! चार बडबडगीतं नि मॅड, स्टुपिड, शटप असे चार शब्द ऐकले की आई - आजीला वाटते मुलगा "साहेब" होणार. साहेबी पोशाख - ऐन उन्हाळ्यात बूट नि टाय, साहेबी अरेरावी ! इंग्रजी माध्यमात शिकण्याचा अहंगड, आजी गावंढळ. पण इंग्रजी तर धड येत नाही, क्रमिक पुस्तकं समजत नाहीत म्हणून वैभल्यग्रस्तता. अशा विचित्र सापळ्यात मुलं नि पालक अडकले आहेत. या मागचा राज्यकर्त्यांचा डाव लक्षातच घेतला जात नाहीये.

इंग्रजी भाषा लादण्यामागील राजकारण : ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने १७५७ पासून हिंदुस्थानात साम्राज्य स्थापन केल्यावर प्रारंभीच्या काळात त्यांनी फारसी, अरबी, संस्कृत भाषांतील अभ्यासास साहाय्य चालू ठेवले. प्रांतिक ब्रिटिश अधिकाऱ्यांची भूमिका होती की पाश्चिमात्य विज्ञान व अन्य साहित्य भाषांतर करून विविध भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करावे आणि शिक्षणाचे माध्यम प्रांतिक भाषाच असाव्यात. परंतु हिंदुस्थानातील सर्वोच्च ब्रिटिश अधिपती - गव्हर्नर जनरल यांच्या प्रशासकीय मंडळांमध्ये १८३४ साली नेमण्यात आलेल्या

कायदे सल्लागार टी. बी. मेकॉले यांच्या सल्ल्यामुळे कंपनीने आपले धोरण बदलले. मेकॉले यांनी सुचवले की, भारतीयांना 'गुलाम' बनवण्यासाठी त्यांना इंग्रजी भाषेतून शिक्षण देऊन हे बिंबवले पाहिजे की जे जे परेदशी, इंग्लिश आहे तेच अस्सल, उच्च दर्जाचे आहे आणि जे जे भारतीय आहे ते खालच्या दर्जाचे, हीन आहे. तरच ते त्यांचा आत्मविश्वास गमावतील आणि ब्रिटिशांची गुलामी स्वीकारतील. एतद्देशीयांना शिक्षण द्यावयाचे तर इंग्रजी भाषाच सर्वोत्तम आहे. आपल्या मर्यादित खर्च क्षमतेमध्ये सर्वांना शिक्षण देणे आपल्याला परवडणार नाही. तेव्हा आपण असा वर्ग निर्माण करू की जो आपण (ब्रिटिश राज्यकर्ते) व आपण राज्य करील असलेले कोट्यवधी (हिंदी प्रजा) या मधील दुवा असेल. हा वर्ग रक्ताने व रंगाने हिंदी असेल पण आवडी - निवडी, मते, नीतीमूल्ये आणि बुद्धीने तो इंग्लिश असेल. या इंग्लिश शिक्षित वर्गाने देशातील स्थानिक भाषा प्रगल्भ कराव्या, पाश्चिमांत्याकडून घेतलेल्या शास्त्रीय संज्ञांसाठी पारिभाषिक शब्दांची भर घालून त्या संमृद्ध कराव्या. त्या भाषा ज्ञानप्रसाराचे समर्थ साधन बनवण्याचे काम करावे आणि बहुजन समाजापर्यंत भारतीय भाषांमधून ते ज्ञान पोचवावे.

परंतु इंग्रजी शिक्षण घेतल्याने सरकारी नोकरी सहजी मिळत असल्यावर भारतीय भाषा संमृद्ध करून स्वभाषेतून देशबांधवांना शिक्षित करण्याच्या आवाहनास कोण प्रतिसाद देणार? हिंदुस्थानातील पारंपरिक शिक्षित जातीच-ब्राम्हण-कायस्थ आदी इंग्रजी शिक्षणामध्ये सहजी प्रगती करू शकल्या. या जनतेपासून अलग, स्वत:ला उच्च मानणाऱ्या होत्या आणि शिक्षणाची मक्तेदारी स्वत:च्या हातात ठेवण्यातच त्यांचे हितसंबंध होते. ती मक्तेदारी त्यांनी दोन हजार वर्षे राखलेली होती. आता इंग्रजी भाषा ज्ञान हे मक्तेदारी राखण्यासाठी उत्तम हत्यार त्यांना ब्रिटिश राजवटीखाली मिळाले होते. त्याचा त्यांनी पुरेपूर फायदा उठवला. सर्व क्षेत्रातील उच्च पदे त्यांनी पटकावली. हा अभिजन वर्ग इंग्लिश ज्ञानाचा दंभ, साहेबी वेशभूषा व आचारांचा अहंगंड आणि कष्टकरी जनतेबाबतची तुच्छता भाव बाळगतो. **या उच्च जाती व उच्च वर्गाने स्वातंत्र्यपूर्व काळातच नव्हे तर स्वातंत्र्योत्तर काळातही इंग्रजीचे वर्चस्व कायम राखले आहे व जनसामान्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा चालवला आहे.** या अभिजन वर्गाने ना आपल्याकडे उपलब्ध असलेली ज्ञाननिर्मितीची क्षेत्रे खुली केली, ना भाषांतर करून इथल्या भाषांची क्षमता वाढवली आणि जनतेपर्यंत आधुनिक ज्ञान - विज्ञान पोचवले, ना भारतातील भाषिक वैविध्याचा आदर केला.

ब्राह्मण इंग्रजी शिकतात व पुढे जातात. म्हणून त्यांचे अनुकरण करत इंग्रजी डोक्यावर

घेतले जात आहे. पण इंग्रजी शिकून जागतिक मंचावर ब्राह्मणांनी असे काय दिवे लावले? अमेरिका - इंग्लंडमध्ये स्थलांतरित झालेले आंग्लशिक्षित ब्राह्मण काय थोडे आहेत? पण सारे चाकरच आहेत ना? कोणी स्वतंत्र प्रज्ञा दाखवून ज्ञाननिर्मितीच्या क्षेत्रात मोठे कर्तृत्व गाजवले? सामाजिक क्षेत्रात खास नावाजण्यासारखे काम केले? भारतीय उच्चशिक्षित ज्ञान - विज्ञानाच्या क्षेत्रात भरारी मारू शकत नाहीत याचे कारण मुळी हे आहे की त्यांनी इंग्रजी भाषेच्या कुबड्या घेतल्याने ते पांगळे बनले आहेत. त्यांची इंग्रजीची शेखी फक्त दलित - बहुजनांपुढे, ज्यांना ते मोठे ''ग्रेट'' वाटतात. उच्चवर्गीय - उच्चवर्णीयांची अमेरिकेपुढे नतमस्तक होण्याची, साहेबाचे अंधानुकरण करण्याची गुलामी वृत्ती आणि दलित, बहुजन, कष्टकऱ्यांच्या श्रमांचे शोषण करून चैन चंगळबाजीत मशगुल होण्याचे स्वार्थांध वर्तन आपण आदर्श का मानावे? गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घातलेले आदर्श का सोडावे?

बौद्ध धम्माची शिकवण : बौद्ध धम्म म्हणजे जगण्याची नीती, जगण्याची कला. धम्म म्हणजे धर्म - religion नव्हे. बौद्ध धम्म हा सम्यक जीवनमार्ग आहे. तो २२ प्रतिज्ञांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या लाखो अनुयायांनी स्वीकारला. त्यातील प्रज्ञा, शील, करूणा ही तत्त्वे इथल्या दलित कष्टकरी, शोषित व स्त्रियांना मुक्तीचा मार्ग म्हणून उपयुक्त आहेत. शतकानुशतके दलित - बहुजन समाजाला धर्म - पुनर्जन्माच्या थोतांडात अडकवून उच्चवर्णीयांनी कष्टकरी समाजाला गुलामीत जखडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्म नाकारून गुलामीच्या बेड्या तोडल्या. परंतु अजूनही म्हणावी तेवढी मानसिक गुलामगिरीची पकड सुटलेली नाही. ब्राह्मणांचे थोड्या फार प्रमाणात अनुकरण चालू आहे. हा ब्राह्मण वर्ग इंग्रजी माध्यमाला कवटाळून अधिकाधिक आत्मकेंद्री बनून समाजाबाबत, मराठी भाषेबाबत तुच्छता बाळगून आहे. पण बौद्ध धम्माच्या तत्त्वज्ञानात हे बसत नाही. माणसाला माणूस म्हणून स्थान नाकारणाऱ्या, सतत अवहेलना करणाऱ्या हिंदू धर्माला मूठमाती देऊन ज्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला त्यांनी नेकीने, ताठ मानेने आपल्या सम्यक जीवनमार्गावर ठामपणे उभे राहिले पाहिजे. मोठ्या परिश्रमाने शिक्षण घेऊन नवनवीन क्षितिजे खुली करून घेत तंत्रवैज्ञानिक प्रगतीबरोबर अनेक नवी क्षेत्रे खुली करून घेतली पाहिजेत. जागतिकीकरणाच्या जमान्यातील काही नव्या क्षेत्रांमध्ये जेवढी इंग्रजी संवादज्ञानाची अट घातली जात आहे, त्यामध्ये कमी पडल्याने असे वाटू लागले की बालपणापासून इंग्रजी माध्यमातून शिक्षण सुरू करून १०-१२

वर्षे ते चालू ठेवले तर इंग्रजीवर प्रभुत्व मिळवता येईल. पण ही कल्पना भ्रामक आहे. उलट परिसरात, नसलेली पूर्णतया परकी भाषा माध्यम बनवले तर इंग्रजी व आपली भाषा यामध्ये गोंधळ उडून कोणतीच भाषा चांगली येत नाही. इंग्रजी माध्यमामध्ये शिकण्यामुळे आणखी एक मोठा धोका आहे. तो असा की इंग्रजी माध्यमात शिक्षण घेणारे, इंग्रजी न येणाऱ्या मावशी - चुलतीला, शेजाऱ्यांना अडाणी, कनिष्ठ मानू लागतात, म्हणजे पुन्हा जातिव्यवस्था आलीच ! दुसरा धोका म्हणजे आपले स्वभाषेबरोबरचे संबंध दुरावतात. भाषा ही फक्त संवाद साधण्याचे साधन नाही. ती माणूस घडवते. प्रश्न फक्त माध्यमाचा नाहीये. माध्यमाबरोबर अमेरिकी समाजाची चालरीत, जीवनमूल्ये ही नकळत भिनवली जातात. बौद्ध धम्मीय तर अमेरिकेला आदर्श मानणे शक्य नाही.

बौद्ध धम्माची शिकवण आहे प्रज्ञा, शील, करूणा, समता. याउलट अमेरिकी राज्यकर्ते साऱ्या जगावर वर्चस्व गाजवून येथील संपत्ती लुबाडून, लाखोंची हत्या करून आपली सत्ता व संपत्ती वाढवत आहेत. तेथील श्रीमंत लोक जागतिक लुटीच्या जोरावर चैनचंगळबाजी करीत आहेत इराकसारखी प्राचीन, समृद्ध, सधन संस्कृती सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास साधत होती. तेथील तेल साठे कार्बीज करण्यासाठी अमेरिकेने त्याची राखरांगोळी केली. अफगाणिस्तान, लीबिया, सीरिया उद्ध्वस्त करीत आहेत. इंग्रजी भाषा ही या साम्राज्यशाहांची भाषा आहे आणि त्यांचा मुळी हेतूच आहे की इंग्रजी माध्यमाचे वेड लावून, पैशाच्या लोभात - वस्तूंच्या वेडात साऱ्यांना गुंतवायचे. एकदा पैसा हे दैवत बनले की स्पर्धा, वाममार्ग, हाव, व्यसने अशी अधोगतीची मालिका नकळत सुरू होते. बौद्ध धम्माची शिकवण आहे नीतीमान व विवेकवादी, संयमी वागणुकीची. मुलांना बालपणापासून इंग्रजी माध्यमाच्या जाळ्यात अडकवले तर नकळतच अमेरिकी उपभोगवादाच्या सापळ्यात सापडून धम्माच्या विचारांचा बळी जाण्याचा धोका आहे.

इंग्रजी न बोलता येण्याच्या न्यूनगंडापायी मायबोली सोडून इंग्रजीला डोक्यावर बसवली तर मनोऱ्याच्या शिखरावर अमेरिकी साहेब, पुढच्या पायरीवर उच्चशिक्षित ब्राह्मण, त्याच्या पुढच्या पायरीवर ब्राह्माळलेले उच्चशिक्षित बिगर ब्राह्मण,.... अशा उतरंडीच्या तळाच्या पायऱ्यांवर दलित, आदिवासी, भटके असे सारे वंचित ! पारंपरिक जातिव्यवस्थेची उतरंड नाकारण्याच्या ईर्षेत, नव्या जातिव्यवस्थेत अडकावयाचे नसेल तर मुलांना मराठी माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे व एक भाषा म्हणून इंग्रजी भाषा शिक्षण देणे हाच मार्ग आहे.

शिक्षणाचे समुचित माध्यम : ''मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे. मानसशास्त्रीयदृष्ट्या पाहाता मातृभाषा हेच आकलन व अभिव्यक्ती याचे नैसर्गिक माध्यम होय. समाजाशी संवाद साधण्याचे, एकरूप होण्याचे तेच माध्यम असते. मातृभाषेतून शिक्षण घेणे हे सहज सुलभ असते. अन्य कोणत्याही भाषेतून शिक्षण घेण्यापेक्षा मातृभाषेतून झरझर शैक्षणिक प्रगती होते. कारण मुलाचा बौद्धिक, भावनिक, सामाजिक विकास हा मातृभाषेतून होतो. भाषा आणि विचार हे हातातहात घालून पुढे जातात.'' हे प्रमेय जगभर मान्यता पावलेले आहे. आपणास मातृभाषा येते ती एक वैचारिक वारसा, समाजाच्या इतिहासाचा भाग म्हणून आपणाकडे येते. सामाजिकीकरणाचा तो प्रमुख भाग आहे. नागरिकांचे सामाजिकीकरण झाले नाही तर ती सामाजिक व्यवस्था भ्रष्ट बनते. ज्याला मातृभाषा येत नाही आणि परक्या भाषेच्या माध्यमाद्वारा जो वावरतो तो आपली भाषा, समाज, सामाजिक जाणिवा व बांधिलकी सारेच हरवून बसतो. त्रिशंकूसारखी त्यांची अवस्था होते.

जी भाषा मुलांना समजते, ज्यातून त्यांना विचार व भावना व्यक्त करता येतात, जी भाषा घरीदारी, शेजारीपाजारी, समाजात वापरली जाते, तीच भाषा जर शाळेतील शिक्षणाचे माध्यम असेल तर मुलांना शिकण्यात गोडी वाटते, मुलांना विषय समजतो. मुले प्रश्न विचारतात, उत्तरे देतात, शिक्षण प्रक्रिया जिवंतपणे पुढे जाते. परिचित शब्द - भाषा या माध्यमापासून शिक्षणाचा प्रारंभ केला तर भाषा शिक्षणात प्रगती होऊन अन्य विषयांचे आकलनही सहज सुलभ होते. स्वभाषेत भावना, संकल्पना, विचार पोचवणे सुलभ असते. त्याआधारे उदात्त भावना, सहअनुभूती, जिव्हाळा अशा सकारात्मक भावना, विचार, मूल्ये रूजवणे, गोष्टी, कविता आदीतून विचाराला चालना, कुतुहल जागृती, मानवी मूल्ये पोचवणे, सामाजिकता, सहकार्य, आनंदी, खिलाडू वृत्ती जोपासणे शक्य होते.

मराठी माध्यमातून शिक्षण घेतले तर शाळेत प्रवेश घेताना मुलांना मराठी भाषा अवगत असते. त्यामुळे शाळेतील औपचारिक शिक्षणासाठी जी क्रमिक पुस्तके वापरली जातात ती जर सुबोध मराठीत असतील तर मुलांना ती सहज समजू शकतील व प्रगती होऊ शकेल. आज क्लिष्ट, कृत्रिम भाषा, माहितीचे नाहक ओझे यामुळे क्रमिक पुस्तके दुर्बोध बनून नकोशी वाटतात. तेव्हा आज गरज आहे ती क्रमिक पुस्तकांमधील मजकूर रसपूर्ण शैलीत करण्याची, त्यातील परिभाषा सुधारण्याची. पाठ्यपुस्तके सर्व महाराष्ट्रासाठी एकच एक साचेबंद पद्धतीने न करता प्रादेशिक पातळीवरील भाषिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन विविधता लक्षात घेऊन

त्यामध्येही लवचीकता आणावयास हवी. अशा सुधारणा करणे आवश्यक आहे आणि आपण प्रयत्न केला तर ते निश्चित शक्य आहे. परंतु ती अवघड असतात, ब्राह्मणी भाषेत असतात मग इंग्रजी माध्यम काय वाईट हा युक्तिवाद फसवा आहे. ब्राह्मणांनी मराठी भाषा संस्कृतप्रचूर करून बिघडवली व ती तथाकथित 'प्रमाण भाषा' पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांवर लादली जाते म्हणून आपण मराठी भाषेवरच काट मारायची का?

स्वभाषेचे महत्त्व : प्रत्येक समाजाचा जगाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन असतो. त्या त्या समाजातील भाषेतील प्रत्येक शब्दाला जोडलेला एक सामाजिक इतिहास असतो. मूल शिकते तेव्हा ते स्वतःला सभोवतालच्या परिसराशी - माणसे - प्राणी - वस्तू यांच्याशी जोडत असते. त्याचे शब्दरूप स्मृतीत साठवत असते, त्यातून त्याचे व्यक्तिमत्व घडत असते. आपल्या जीवनाशी संबंधित नित्यनवे शब्द आपल्या भाषेत समाविष्ट होत असतात. आपण मुलाला स्वभाषेपासून तोडून पूर्णतया परक्या देशातील भाषा त्यावर लादतो तेव्हा येथील जनसमूहाशीच फारकत घडवत असतो. मराठी समाजापासून तोडत असतो. एवढेच नव्हे तर इंग्रजी भाषा ही जगाची भाषा आहे म्हणून श्रेष्ठ आहे, असा भ्रम भारतात अभिजनांनी रुजवला असल्याने इंग्रजीत चार शब्द बोलले, ''रेन रेन गो टू स्पेन'' हे बाळगाणे म्हटले तर कौतुकाने आईचा ऊर भरून येतो. मग मुलाच्या लेखी ते केवळ निरर्थक शब्द असोत. ''येरे येरे पावसा, तुला देतो पैसा'' यामध्ये हंगामी पाऊस पडणाऱ्या महाराष्ट्रात मोसमी पावसाचे आतुरतेने स्वागत करण्याची भावना आहे, ते मुलाला परिसरातील मानसिकतेशी जोडणारे आहे म्हणून अर्थपूर्ण आहे. इंग्लंडमध्ये वर्षभर केव्हाही पाऊस पडतो म्हणून पावसाला कंटाळून ''गो टू स्पेन'' हे गीत चपखल ठरते. ते गीत उन्हाळ्यात उन्हाने जिवाची काहिली होत असताना मराठी मुलाने गाणे हे अर्थहीनच होते. इंग्रजी माध्यमाचा ध्यास, मुलाला मराठी समाजजीवन, जीवनदृष्टी व जीवनमूल्ये, साहित्य, कला या सर्वांपासून तोडत आहे. मराठीतून बोलण्याची लाज, 'चोरी' असा न्यूनगंडाने पछाडलेला, आत्मविश्वास गमावलेला किशोर, इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या सापळ्यात ''यशस्वी'' होण्याच्या आशेने अडकवला जात आहे. पण ते मृगजळच ठरणार. बाप श्रीमंत नसल्याने 'नोकरी'साठी ''नजराणा'' देण्याची ऐपत नसेल, ''वशिला'' लावता येत नसेल तर तो ''यशस्वी'' कसा होणार? आजच्या समाजातील आहेरे व नाहिरे यातील प्रचंड दरी लक्षात न घेता नाहिरेंना बंद झालेली दारे इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याच्या प्रयत्नातून उघडतील असे मानणे, म्हणजे स्वप्नरंजनात मशगूल होणे.

मराठीचा विकास : मराठी भाषेला २००० वर्षांचा इतिहास आहे. इ.स. पहिल्या शतकात स्त्रियांच्या तोंडी मराठी भाषा असल्याचे मानले जाते. १२९० मध्ये ज्ञानेश्वरांनी 'भावार्थ - दीपिका' रचली, तोवर मराठी भाषा सर्वार्थक्षम झालेली होती. स्त्रियांची बोली, महानुभाव पंथ, चोखामेळा, सेना न्हावी, सावता माळी, गोरा कुंभार, नामदेव, जनाबाई, तुकाराम आदी बहुजन समाजातील संतकवी, वीरशैव, जैन, सुफी, ख्रिश्चन संत, कन्नड, फारसी, तेलुगु, तमिळ आणि विविध बोलीभाषा यांच्या आदानप्रदानातून समाईक मराठी भाषा विकसित झाली. पेशवाईमध्ये चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण सत्ताधारी बनले तरी चित्पावनांची "चित्पावनी" भाषा राज्यकारभाराची भाषा झाली नाही, तर शिवकालापासून रुळलेली बहुजनांची मराठीच राजभाषा राहिली. बोली भाषांमधील शब्दोच्चार, वाक्यरचनेची धाटणी, बोलण्याची लकब या सर्वातील वैशिष्ट्ये संभाळण्यातच भाषेची संपन्नता असून त्याद्वारे भाषा समृद्ध बनते.

मराठी भाषा ही श्रम करणाऱ्या व राबणाऱ्या माणसांनीच निर्माण केलेली आहे. भाषेचा विकास हा परिसराशी निगडीत आहे. प्रदेशाची भौगोलिक वैशिष्ट्ये - डोंगराळ मुलुख, भरपूर पाऊस, वाळवंटी, दुष्काळी मुलुख, समुद्र सांनिध्य अशा स्थानिक पर्यावरणानुसार बहरलेले वनस्पती, कीटक, पक्षी, प्राणी जीवन आणि त्या अनुसरून श्रमिकांनी विकसित केलेली शेती, मच्छीमारी, कारागिरी, त्यांची अवजारे, यंत्रे व त्याच्याशी संबधित उत्पादनाच्या प्रक्रिया, सण आणि त्याबरोबर फुलणाऱ्या ओव्या, अभंग, म्हणी, वाक्प्रचार यातून भाषा समृद्ध होत असते. भारतातील बहुसंख्य जनता ही निसर्गाधारित उत्पादन प्रक्रियेमध्ये गुंतलेली असल्याने त्यांची भाषा स्थलवैशिष्ट्यपरत्वे - बारा कोसावर - बदलते. ज्यांचा उत्पादन साधनांशी संबंधच आला नाही, त्यांना लोकभाषांमधील अर्थाच्या सूक्ष्म छटा, सौंदर्य, डौल समजलेला नाही, अशा विद्वानांनी संस्कृतप्रचुर भाषा धार्मिक व राज्यसत्तेचा आधारावर "श्रेष्ठ" ठरवली आणि इंग्लिश अमलानंतर इंग्लिशचा कित्ता गिरवून लिखाण क्लिष्ट व बोजड बनवले. पण त्यामुळे समाईक मराठीचा विकास काही खंडित झालेला नाही. लोकव्यवहार व लोकसाहित्य यांच्याशी जिवंतपणे बांधलेली समाईक मराठी अधिकाधिक रसरशीत आणि समर्थ करणे आपल्या हातात आहे. आम समाजाला ज्ञानाची दारे खुली झाल्यावर मराठी काव्यात, गद्य साहित्यात, वैचारिक लिखाणात लक्षणीय अशी भर बहुजन, दलित लेखकांनी घातली आहे. परंतु इंग्रजी माध्यमाच्या वेडापायी मायबोलीपासून मुलांना तोडून स्वभाषेतून सर्जनशीलतेने होणाऱ्या वैचारिक व साहित्यिक अभिव्यक्तीला खीळ बसण्याचा धोका निर्माण होत आहे.

इंग्रजी माध्यमाने शिक्षणाचा खेळखंडोबा : इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुले प्रवेश घेतात तेव्हा परिसरात नसलेली, पूर्णतया परकी भाषा, वेगळी वाक्यरचना, अत्त्यंत अवघड स्पेलिंग असलेली भाषा आत्मसात करण्याचे न पेलण्याजोगे आव्हान उभे ठाकते. स्वभाषेचा पाया पक्का झालेला नसतानाच परकी भाषा माध्यम म्हणून लादल्याने कोणतीच भाषा धड येत नाही. इंग्रजांच्या काळातसुद्धा अशी अनैसर्गिक शिक्षण व्यवस्था लादण्यात आलेली नव्हती. प्राथमिक शाळेत पहिली ते पाचवी मराठी भाषा आणि गणित व सामान्यज्ञान इत्यादी सर्व विषय मराठी माध्यमातून शिकवले जात. नंतर माध्यमिक शाळेत पहिली तीन वर्षे इंग्रजी भाषा शिकवली जाई व सर्व विषयांचे माध्यम मराठीच असे. इंग्रजी भाषा शिकल्यानंतर इंग्रजी माध्यम सुरू होई. पुढे ही व्यवस्थाही बदलून मॅट्रिकपर्यंत (शालांत परीक्षा) मराठी माध्यम करण्यात आले. आता मात्र इंग्रजी भाषा अजिबात येत नसताना इंग्रजी भाषेतील क्रमिक पुस्तके एकदम वापरावी लागतात व विद्यार्थ्यांची पुरी तारांबळ उडते. शाळेत प्रवेश घेतल्या घेतल्या, परकी भाषा शिकणे व त्या न येणाऱ्या भाषेतून नवे विषयज्ञान पैदा करणे याचा असह्य बोजा बाल वयातील मुलावर पडतो. त्याचा मानसिक व शारीरिक अनिष्ट परिणाम संभवतो. भाषाज्ञान नसल्याने विषयज्ञान कच्चे राहते. म्हणजेच प्राथमिक शिक्षणाचा पायाच अगदी डळमळीत राहिल्याने एकूणच शिक्षणात मुले मागे पडून पाचवीपासूनचा वाढता अभ्यासक्रमही पेलत नाही. मुलांच्या पाठीमागे क्लास लावून, अभ्यासाच्या सापळ्यात मुलाला दिवसभर अडकवून प्रगती साधण्याची धडपड चालते. पण अखेर निराशाच पदरी येते. कारण अत्यंत अनैसर्गिक आणि चुकीच्या पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयत्न चालू असतो. परिणामी इंग्रजी धड येत नाही, कोणतेच विषय धड समजत नाहीत. असा शिक्षणाचा खेळखंडोबा होतो. अलिकडे सेमी इंग्रजी म्हणजे विज्ञान व गणित या विषयांसाठी इंग्रजी माध्यम वापरण्याची एक "फॅशन" पसरते आहे. गणिताचा पाया आहे तर्क आणि तर्काचा आधार आहे आपली विकसित विचारशक्ती. गणिती समीकरणे व प्रमेये यातून इंग्रजीचे भाषाज्ञान कसे प्रगल्भ होणार? विज्ञान म्हणजे अचूक प्रश्नांची निर्मिती आणि त्यांच्या उत्तरांचा शास्त्रशुद्ध शोध. परंतु त्यामध्ये परक्या भाषेचा अडसर घातला की प्रश्नच बंद. उत्तरे नुसती पाठ. म्हणजे संकल्पना ज्ञान शून्य आणि विज्ञानाची वाट बंद.

असा युक्तिवाद केला जाते की आदिवासीच्या दृष्टीने मराठी व इंग्रजी दोन्ही परक्याच भाषा आहेत. तेव्हा इंग्रजी माध्यमच बरे. महाराष्ट्रातील आदिवासी भाषा व मराठी एकाच भूमीत,

समान सांस्कृतिक क्षेत्रात वावरणाऱ्या आहेत. वाक्यरचनेची घाटणी व अनेक शब्द समसमान असलेल्या आहेत. शिवाय बाजारात, कचेरीत एकूणच व्यवहारात आदिवासींचा मराठीशी संपर्क येत असल्याने मराठी भाषा त्यांना परकी नसते. त्यामुळे प्राथमिक शाळेत आरंभ आदिवासी भाषेतून करून चवथीपर्यंत मराठीकडे वळणे सहजसाध्य आहे. इंग्रजी भाषा ही परिसरात नसलेली, पूर्णतया परकी असल्याने माध्यम म्हणून वापरली तर शिक्षणात तो अडसरच बनतो.

भाषा शिक्षण व माध्यम यात गफलत : उच्चवर्णीय इंग्रजी माध्यमाकडे वळल्याने असा भ्रम निर्माण झाला आहे की, इंग्रजी भाषा शिकण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच बालपणापासून गेले पाहिजे. येथे इंग्रजी भाषा शिक्षण आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण याची गफलत केली जाते आहे. पोटापाण्यासाठी आवश्यक म्हणून आपण अनेक कौशल्ये आत्मसात करतो - उदाहरणार्थ टंकलेखन, सुतारकाम, संगणकाचा वापर, विविध यंत्रे चालवणे, दुरुस्ती, इत्यादी. इंग्रजी भाषा ज्ञान हेही एक प्रकारचे कौशल्यच आहे. तेव्हा विविध प्रकारच्या नोकरीसाठी इंग्रजी भाषेचे ज्या पातळीवरील आकलन आवश्यक असेल (लिपी वाचन, विशिष्ट तांत्रिक शब्दसामग्री, कामचलाऊ प्रश्नोत्तरे, इंग्रजी संदर्भ साहित्यवाचन, संगणकाचा वापर) त्यानुसार ते मिळवणे शक्य आहे. (पाहा : प्रकरण ३) त्यासाठी प्राथमिक शाळेत स्वभाषा शिक्षण पक्के करण्यावर भर दिला पाहिजे. मातृभाषेचा पाया पक्का झाला की अन्य भाषा शिकणे सोपे जाते. तेव्हा इंग्रजी भाषाज्ञान मिळवण्याचा योग्य मार्ग म्हणजे एक भाषा म्हणून माध्यमिक शाळेत इंग्रजी भाषेचे दर्जेदार शिक्षण पुरवणे. चांगल्या गुणवत्तेच्या शाळा सर्वांना उपलब्ध करून देणे. त्यासाठी धोरणात्मक पातळीवर इंग्रजीचे वर्चस्व दूर करण्यासाठी खास प्रयत्न करणे गरजेचे आहे.

भाषिक गुलामीचा मुकाबला : असा दावा केला जातो की जागतिकीकरणाच्या जमान्यात इंग्रजीचे वर्चस्व वाढत जाणे अपरिहार्य आहे आणि त्यापुढे नतमस्तक होऊन सर्वांनी इंग्रजी भाषा शिकण्याचा आटापिटा म्हणजे इंग्रजी माध्यमातूनच सर्व शिक्षण घेतले पाहिजे. यामध्ये पराभूत मनोवृत्ती दिसून येते. बहुराष्ट्रीय कंपन्या भारतातील अधिकाधिक मुलूख काबीज करत आहेत. भारताचे गुलाम बनलेले राज्यकर्ते त्यांचे हस्तक बनून शेतजमिनीचे सक्तीने संपादन व खाणींसाठी आदिवासी ंगले आणि पाडे यांचे उद्ध्वस्तीकरण, अशा अतिक्रमणाला मदत करत पोलिसी बळाने हे आक्रमण रेटत आहेत, तरी आदिवासी त्या विरोधात लढत

आहेतच ना. आदिवासी केवळ ८/१० टक्के आहेत. आपण ८० टक्के आहोत. जातिधर्मांचे पारंपरिक भेदाभेद दूर सारून सर्व श्रमिकांची एकजूट केली तर आपणास इंग्रजीचे वर्चस्व का हटवता येणार नाही? शासननिर्मित ''अधिकृत'' मराठी आणि पढित माहितीकेंद्री शिक्षणव्यवस्थाही हटवून आपण समाईक मराठी आणि बालकेंद्री शिक्षणव्यवस्था का प्रस्थापित करू शकणार नाही? आपल्या मायभाषेतून जर 'खरे शिक्षण' घेतले तर आपली प्रतिभा, सर्जनशीलता सर्व क्षेत्रांमध्ये फुलेल. पण त्यासाठी गोरे साहेब व ब्राह्मण या युतीने लादलेले इंग्रजीचे वर्चस्व आणि निमूट कारकून बनवणारी शिक्षणपद्धती हटवली पाहिजे. आपण एका दुष्टचक्रात अडकलो आहोत. प्रचलित शिक्षणपद्धतीमुळे गुलामी - निमूट मनोवृत्ती भिनवली जात आहे. गुलामी वृत्ती कायम ठेवण्यासाठी गोरे साहेब व ब्राह्मण इंग्रजी भाषा लादत आहेत हे लक्षात न घेता उलट ब्राह्मणांचे अंधानुकरण करू पाहत राहिले तर आपण कायम दुय्यम स्थानावरच राहणार. याहूनही महत्त्वाचे म्हणजे आपला स्वाभिमान, आपली भाषा, आपले स्वत्व, आपले मानवत्व, आपली मूल्ये नष्ट करणारी, पैसाकेंद्री अमेरिकी अप्पलपोटी स्वार्थांधवृत्ती, जी इंग्रजी भाषा आणि माध्यमांतून मारा होत असलेला उपभोगवाद याद्वारा आपणापर्यंत पोचत आहे, त्याने काय मानवी प्रगती होणार आहे? खेळाचे नियम ठरवणे आपण आपल्या हाती घेतले पाहिजे. समाईक मराठीतून सर्व अर्थव्यवहार, शासन - न्याय व्यवहार, विद्यापीठअखेर शिक्षण याचा आग्रह धरला तर आपणास सर्व क्षेत्रे खुली होतील.

नवे वैज्ञानिक युग : भांडवलशाहीच्या आरंभीच्या काळातील तंत्रविज्ञानाची प्रगती उद्योगाचे व भांडवलाचे केंद्रीकरण करण्यास पोषक असल्याने शेतीतून उखडून टाकलेल्या शेतकऱ्यांना कामगार बनून यंत्राचे गुलाम बनवण्याविना पर्याय नव्हता. पण अलिकडील तंत्रवैज्ञानिक प्रगती विकेंद्रीकरणास पोषक आहे. संगणक, आंतरजाल, चलभाष (मोबाईल) आदी आधुनिक तंत्रज्ञान सार्वत्रिक बनले आहे. इजिप्तमध्ये हुकुमशाही उलथवण्यासाठी त्याचा वापर मदतकारक ठरला. माहिती - तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात शिक्षण माहितीकेंद्री ठेवण्याचे काहीच कारण नाही. आंतरजालद्वारा माहितीचे भांडार खुले आहे. कोणती माहिती कशासाठी वापरावी, विश्लेषण कसे करावे, तर्कशुद्ध विवेचन क्षमता, स्वाध्यायपद्धती रुजवली तर त्या माहितीचा यथायोग्य उपयोग करता येईल. ब्रिटिश काळापासून जी शिक्षणपद्धती प्रचलित आहे ती केवळ पांढरपेशी खर्डेघाशी वृत्ती जोपासणारी, बालकाची सर्जनशीलता मारून टाकणारी अशी आहे. ब्राह्मण श्रम तुच्छ मानतात म्हणून पुस्तकी शिक्षण हेच फक्त शिक्षण अशी भ्रमाधारित

शिक्षणपद्धती त्यांनी लादलेली आहे. मुलाच्या विकासाला आणि सामाजिक प्रगतीला खरे तर सर्वच क्षमतांचा विकास साधणे पायाभूत आहे. तेव्हा प्रचलित पंतोजी शिक्षण पद्धती आणि परीक्षार्थी शिक्षण ही पद्धत बदलून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, कलात्मक, मानसिक, शारीरिक, वैचारिक, सामाजिक क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने सर्व विषयांना समान स्थान दिले पाहिजे. शिक्षणाचे स्वरूप ''शिकवणे'' असे न ठेवता कार्यानुभव, प्रयोग, निरीक्षण, चर्चा या सर्वांवर भर देऊन क्रमिक पुस्तके मुख्यतः सैद्धांतिक, तात्त्विक, पद्धतविषयक विवरण करणारी, प्रयोग, उदाहरणे यातून आकलन प्रगल्भ करणारी अशी हवी. असे समुचित शिक्षण घेऊन शेती - कारागिरी ज्ञान, कलाकुसर, वाङमयीन व कला प्रतिभा यांचा जरूर तेथे आधुनिक तंत्राचा वापर करून सर्जनशील आविष्कार करून सर्वांगीण प्रगती साधणे शक्य आहे.

''मराठीतून शिकण्याचा आग्रह'' धरला तर त्यावर ब्राह्मणी कावा असा शिक्का मारून, जनतेची दिशाभूल करून गावोगावी इंग्रजी माध्यमांच्या शाळेचा धंदा जोरात चालू आहे. राज्यकर्ते त्यामध्ये पुढाकार घेत आहेत. बळी जात आहेत कोवळ्या वयाची मुलेमुली, शिक्षणाच्या चरकातून चिपाड बनून बाहेर पडणारी !! त्यामुळे शिक्षणाच्या हेतूलाच काळे फासले जात आहे. शाळेतील शिक्षणातून ज्ञाननिर्मितीची आस असलेली, कल्पक शोध लावण्यासाठी धडपडणारी, शिक्षितांची पिढी निर्माण न होता, इंग्रजी माध्यमामुळे अर्धवट शिकलेली, इंग्रजी न आल्याने न्यूनंगडाने पछाडलेली, आत्मविश्वास गमावलेली, गुलामी वृत्तीची निमूट पिढी निर्माण करून लोकशाहीच्या गोंडस बुरख्यामागून धनिकशाहीची पकड अधिकाधिक घट्ट केली जात आहे. केंद्र सरकारच्या हाती सत्तेचे वाढते केंद्रीकरण केले जात आहे. तेव्हा राज्यकर्त्यांची ही खेळी ओळखून त्याविरोधात संघटित प्रयत्न वाढवले पाहिजेत. आज जागतिकीकरणाच्या हल्ल्याविरोधात आदिवासी, शेतकरी, कामगार, मच्छीमार आपापल्या क्षेत्रात लढत आहेत. त्या सर्वांना जोडणारा एक पैलू म्हणजे इंग्रजी माध्यमाची पकड सोडवण्याची निकड.

आपला मराठीचा आग्रह हा सर्वांच्या आकलनकक्षेत शिक्षण यावे यासाठी आहे. मराठी ही महाराष्ट्रातल्या बहुजनांची भाषा आहे, समाईक मराठी माध्यमातून शिक्षण घेणे हे स्वाभाविक व शिक्षणशास्त्रीय कसोट्यांनुसार आहे. लोकभाषेचा हा आग्रह अर्थातच अस्मितावादी भूमिकेहून पूर्णतया भिन्न आहे. भाषा संवादासाठी असतात, अस्मिताबाजीतून मराठी विरुद्ध हिंदी अशा विसंवादाला खतपाणी घातले जाते. त्याचे फुटिरतावादी

'राज'कारण करत मराठीची गळचेपी करणारे इंग्रजी माध्यम मात्र डोक्यावर घेतले जाते आहे.

मराठीची गळचेपी : १९९४ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कलम ५ अन्वये मराठी माध्यमातून उच्चशिक्षण देण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे. पण विद्यापीठे ह्याबाबत उदासीन आहेत. जिल्हा पातळीपर्यंत दिवाणी न्यायालयाची भाषा मराठी असेल असे २१ जुलै १९९८ रोजी राज्यशासनाने अधिसूचनेद्वारे घोषित केले. अजूनही सदर अधिसूचना पाळली जात नाही. प्राध्यापक, वकील आदींना मराठी माध्यमाकडे वळण्यात रस नाही. या वर्गात मुख्यतः उच्चवर्णीयच आहेत. परंतु जे ब्राह्मणेत्तर या पेशात आहेत, त्यातील अनेकांची नाळ समाजापासून तुटल्यामुळे तेही उदासीन आहेत. आपण प्रयत्न केल्यास उच्चशिक्षण, न्यायालयीन कामकाज, प्रशासन यामध्ये मराठीकरणास गती येऊ शकेल. जगभरच्या प्रगत देशांनी भाषांतराद्वारा ज्ञानविस्तार केला आणि स्वभाषेतून त्या ज्ञानभांडाराचा सर्वदूर परिचय करून घेऊन त्यात स्वतंत्र प्रज्ञेने भर घालून ज्ञानसंवर्धन व भाषिक विकास केला. प्रयत्न केला तर भारतीयांना हे निश्चितच साध्य होण्याजोगे आहे. पण आपण इंग्रजीच्या कुबड्या अनिवार्य असेच गृहीत धरले तर कधीच आपली सर्जनशीलता फुलणार नाही, ज्ञानाचा व भाषेचा विकास होणार नाही. तेव्हा आज गरज आहे ती महाराष्ट्रातील महाविद्यालये, विद्यापीठे, शास्त्रज्ञ, लेखक, साहित्यिक यांनी पुढाकार घेऊन मराठीतून विज्ञान, तंत्रज्ञान, कला आदी सर्व शाखांमधून भाषांतर / रूपांतरित किंवा स्वतंत्रपणे साहित्यनिर्मिती करण्याची आणि मराठी भाषा केवळ ज्ञानवाहक भाषा न राहाता ती ज्ञानोत्पादक भाषा बनवण्याची.

स्वातंत्र्य मिळून ६७ वर्षे झाली. आज लॉर्ड मेकॉलेच्या स्वरूपातले येथले काळे साहेब यशस्वी होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्यांना भारतीय जनतेला परकीय ते सर्वोत्कृष्ट, इंग्रजी भाषा जणु देववाणी आणि मराठी, हिंदी, तमिळ... गावंढळ, त्याज्य हे पटवण्यात मोठ्या प्रमाणात यश मिळू लागले आहे. इंग्रजी भाषा न येण्याचा एवढा न्यूनगंड जोपासला गेला आहे की आदिवासी पाड्यापासून खेडोपाडी सर्वत्र इंग्रजी माध्यमाच्या शाळेसाठी लोक जीव टाकत आहेत आणि मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. स्वभाषा गमावली की विचारशक्ती, साहित्य, कला, स्वत्वच गमावले जाऊन ५००० वर्षांचे भारतीयत्व, परकीयांच्या अमलामुळे नव्हे तर स्वकीयांच्या स्वार्थी सत्तालोलुपतेमुळे गमावले जाण्याच्या मार्गावर आहे. तथाकथित लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या नाट्यातून सत्ता कायम टिकवण्यासाठी जनतेला अडाणी ठेवणे या हेतूने इंग्रजी भाषेचे स्तोम माजवले

जात आहे आणि इंग्रजीच्या मृगजळामागे धावाताना जनतेची पुरी फसगत होत आहे.

आज भारतातील कोणत्याही सत्ताधारी पक्षाला याची पर्वा नाही. महाराष्ट्रामध्ये शिवाजीचे वारसदार म्हणवणारे मराठी राज्यकर्ते गेली आठ वर्षे मराठी माध्यमातील विनाअनुदानित नव्या शाळांना परवानगी देण्याचे नाकारून मराठीची गळचेपी करत आहेत आणि इंग्रजी माध्यमातील शाळांना प्रोत्साहन देण्याचे धोरण रेटत आहेत. काँग्रेस पक्ष काय किंवा भाजप काय यांनी अमेरिकेची गुलामी स्वीकारली आहे. काँग्रेसला भारतीय भाषा, संस्कृतीशी देणे-घेणे नाही. हिंदू संस्कृतीच्या अभिमानाच्या वल्गना करणारा भाजपही इंग्रजीचे वर्चस्व स्वीकारून, भारतीय भाषा व संस्कृतीच्या पिछेहाटीबाबत बेपर्वा आहे. आता महाराष्ट्र राज्यात सत्तेवर आल्यानंतर निदान काँग्रेस शासनाचे मराठी माध्यमाच्या शाळांना परवानगी न देण्याचे, मराठी शाळा बंद करण्याचे धोरण तरी भाजप बदलणार का? शिवसेना व मनसे यांचा मराठीचा अभिमान इंग्रजी पाट्यांच्या विरोधापुरता ! एरवी इंग्रजी भाषा माध्यमाच्या शाळा हव्याहव्याशा. मनसे तर भारतीय भाषा - हिंदी व हिंदी भाषकांवरच हल्ला करते.

जागतिक स्पर्धेचे नियम साम्राज्यशाही अमेरिका ठरवत आहे. अमेरिका करीत असलेले इंग्लिशचे अतिक्रमण भारतीय राज्यकर्ते स्वीकारत आहेत आणि इंग्रजी जगतातील दुय्यम नागरिकत्व पत्करत आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात मक्तेदारी टिकवण्याच्या दृष्टीने इंग्रजी वर्चस्वस्थानी ठेवणे त्यांना फायद्याचे आहे. इंग्रजी माध्यमाचे वेड लावून मराठी भाषा व सादगी, नैतिकता, अन्यायास विरोधाचा वारसा यापासून महाराष्ट्रातील बहुजन समाजास तोडून चंगळबाजी, पैसा हेच दैवत, स्वार्थांध वृत्ती ही अमेरिकी अनीती भिनवण्याच्या, अमेरिकी साम्राज्यशाहा व त्यांच्या भारतीय हस्तकांचा डाव आपण उलटवला पाहिजे.

मेकॉलेच्या आधुनिक चेल्यांना आपण त्यांची जागा दाखवून, प्रत्येक राज्यातील अधिकृत भाषा हीच शालेय आणि विद्यापीठ पातळीवरही शिक्षणाचे माध्यम आणि सर्व प्रशासकीय व अन्य व्यवहाराची भाषा बनवली पाहिजे आणि हिंदी ही अखिल भारतीय संपर्क भाषा बनवली पाहिजे. भारतातील सुमारे ४० टक्के जनता हिंदीभाषक आहेत आणि ४० टक्के जनता हिंदी सहज समजेल अशा भाषा - मराठी, गुजराती, बंगाली इ. बोलणारी आहे. दक्षिण भारतातील जनमानसातही हिंदी बोलपट, आकाशवाणी, दूरदर्शन यांमार्फत हिंदी भाषा आणि विशेष लोकप्रिय बनलेली हिंदी सिनेगीते यामुळे हिंदीला स्थान आहे. फक्त पंडितांची संस्कृतप्रचुर ''हिंदी'' न लादता लोकांची बाजारातली, बोलपटातली हिंदी ही संपर्क भाषा म्हणून

स्वीकारावयास हवी. तेव्हा शिक्षण व सर्व व्यवहारांमध्ये विविध भारतीय भाषा वापरल्या जाण्यासाठी आणि शालेय शिक्षणातील इंग्रजी माध्यम हटवण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

कृति कार्यक्रम : आज सर्वांगीण भाषिक विकासाचे सर्वसामान्यांच्या हिताचे प्रारूप जनतेपुढे ठेवणे आणि अशा सम्यक भाषिक विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने शासकीय धोरणांमध्ये बदल घडवणे आणि विद्यापीठांना भाषिक प्रश्नी व्यापक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडणे यासाठी पुढीलप्रमाणे प्रयत्न करणे अगत्याचे आहे.

१. **विद्यापीठ** - महाविद्यालयीन पातळीवर पहिल्या वर्षापासून पदवी वर्षापर्यंत सर्व विद्याशाखांमध्ये मराठी, हिंदी इ. एक भारतीय भाषा हा विषय समाविष्ट करावा. विद्यापीठांनी महाविद्यालयीन पातळीवर सर्व विषयांमध्ये (कायदा, समाजविज्ञाने, निसर्गविज्ञाने, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, इ.) उत्तरपत्रिका मराठीतून लिहिण्याचा विकल्प उपलब्ध करावा. तसेच सर्व विषयांचे शिक्षण मराठीतून देण्याचा कालबद्ध कार्यक्रम आखावा. याकरता सर्व विषयांमधील क्रमिक व पूरक पुस्तकनिर्मितीसाठी साहाय्य व प्रोत्साहन योजना आखून दर्जेदार साहित्य उपलब्ध करावे.

२. **शासकीय पातळी :** (क) मराठी परिभाषा निर्माण करताना क्लिष्ट, कृत्रिम शब्द वापरण्याचा अट्टहास सोडून अर्थवाही, सोपे, सुटसुटीत, सुपरिचित असे शब्द उपलब्ध करावेत. यासाठी परभाषेतील रुळलेले सोपे शब्द कायम ठेवणे, बोलीभाषेतील, विविध कारागिरांच्या वापरातील शब्द, हिंदी व अन्य भारतीय भाषांमधील आणि संस्कृतोद्भव अर्थवाही शब्द स्वीकारणे असा लवचीक दृष्टिकोन स्वीकारावयास हवा. शालेय क्रमिकपुस्तके अचुक, रसपूर्ण व सुलभ भाषेत असावी. शासकीय आदेश, परिपत्रके, प्रकाशने, न्यायालये यामध्ये कृत्रिम, बोजड भाषेच्या ऐवजी अर्थवाही सुबोध भाषा वापरावी. (ख) उच्च न्यायालयापर्यंतच्या सर्व न्यायालयांमध्ये दावा दाखल करणे, दावा चालवणे व निकालपत्र मराठीमधून देणे या धोरणाची अंमलबजावणी केली पाहिजे. (ग) घटनेच्या अनुच्छेद ३४८(२) अन्वये मराठीला उच्च न्यायालयाच्या प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळण्याची तरतूद आहे. त्यानुसार उच्च न्यायालयातील कामकाजासाठी मराठीचा पर्याय उपलब्ध करून दिला पाहिजे. (घ) शासकीय पातळीवर संगणकामध्ये युनिकोड हा प्रमाणित ठसा (फॉन्ट) याचा वापर सार्वत्रिक केला पाहिजे. त्यासाठी इनस्क्रिट या प्रमाणित कळपट्टीचा (की-बोर्डचा) वापर केला पाहिजे. (च) शासनाने विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ स्थापन करून

सत्तरीच्या दशकात विज्ञान शाखेतील विविध विषयांवर पुस्तके लिहून घेऊन, ती छापली. पण त्यांचा वापर झाला नाही. सदर मंडळ शासनाने बरखास्त केले. ते पुनर्स्थापित करून महाविद्यालयीन पातळीवर सर्व विषयांचे शिक्षण मराठीतून देण्यासाठी या विषयांमधील क्रमिक पुस्तकनिर्मितीसाठी साहाय्य योजना आखून दर्जेदार साहित्य उपलब्ध केले पाहिजे. (छ) भारतीय व परदेशी भाषांतील दर्जेदार साहित्याची मराठी भाषेमध्ये भाषांतरे, रूपांतरे करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. वाचनाची गोडी निर्माण करण्याकरता दर्जेदार बाल व किशोर साहित्य स्वस्त किंमतीत पुरवले पाहिजे. (ज) जिल्हा परिषदा व नगरपालिका, महानगरपालिका यांच्या शाळांमधून मराठी माध्यमातून, बालककेंद्री व गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांना मोफत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाने चोखपणे पार पाडली पाहिजे. प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयीन पातळीपर्यंत कोणत्याही पायरीवर इंग्रजी भाषा-शिक्षण सक्तीचे असू नये. प्राथमिक शाळेत मराठीचा पाया पक्का करून माध्यमिक शाळेत चांगले प्रशिक्षित शिक्षक नेमून इंग्रजी व हिंदी भाषा शिकवण्याची व्यवस्था करावी. (झ) जिल्हा परिषदा व नगरपालिका, महानगरपालिकांनी मराठी माध्यमाच्या शाळा बंद करू नयेत, इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढणे बंद करावे. मराठी वा गरजेप्रमाणे अन्य भारतीय भाषा या माध्यमामधून सर्व शाळांतून दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी चोखपणे पार पाडावी. (ट) शासनाने मागणीप्रमाणे मराठी माध्यमाच्या शाळा उघडण्यास परवानगी दिली पाहिजे.

३. आदिवासी बोलीभाषांतून प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ करावयास हवा. देवनागरी लिपी शिकवून क्रमशः बोलीभाषा-लेखन आणि त्याबरोबर मराठी शब्दांची सांगड घालत चौथीपर्यंत मराठी भाषेकडे स्थित्यंतर करावे.

४. समाईक मराठी आणि विविध बोलीभाषा यांच्या विकासासाठी व त्यांमध्ये सेंद्रिय संबंध प्रस्थापित करण्यासाठी संशोधन व अभ्यास हाती घेणे महत्त्वाचे आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या वेगाने होणाऱ्या प्रगतीबरोबर मराठीतील शास्त्रीय साहित्यामधे भर घालत राहणे अगत्याचे आहे. भाषा प्रगल्भ व समृद्ध करण्याबरोबर वाचन संस्कृती जोपासणे हे वैचारिक जिवंतपणा आणि डोळस निर्णयप्रक्रिया समाजामध्ये रुजवण्यासाठी नितांत महत्वाचे आहे. याकरताही विशेष प्रयत्न व्हायला हवेत.

५. शिक्षणाचा जगभर मानमान्यता पावलेला व प्रचलित असलेला मार्ग म्हणजे प्राथमिक शाळेपासून उच्च शिक्षण अखेर स्वभाषा हे शिक्षणाचे माध्यम ठेवणे आणि स्वभाषेचा पाया पक्का झाल्यावर परकी भाषा ही किशोरवयात किंवा त्यानंतर एक भाषा म्हणून शिकणे. भाषा

शिक्षणाची ही जगभर मान्यता पावलेली अनुभवजन्य भूमिका शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्यापर्यंत पोचवण्यासाठी प्राध्यापक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक आदींनी स्थानिक वृत्तपत्रे, नियतकालिके यामध्ये लेख, प्रसार माध्यमातून चर्चा, परिसंवाद, मेळावे, संवाद - यात्रा याद्वारे खास प्रयत्न करावेत.

६. स्थानिक साहित्य संमेलने, नाटके, काव्यांच्या मैफिली व लिखित साहित्य प्रकाशनास खास उत्तेजन देऊन बोली भाषेतील विविधता जोपासली पाहिजे.

७. शिक्षक संघटना, पालक संघटना, कामगार संघटना आदींनी शासनाने इंग्रजी माध्यमाचा प्रसार थांबवावा, मराठी माध्यमांच्या शाळा बंद करू नयेत व त्या दर्जेदार बनवाव्या, परिभाषा सुधारावी, सर्व पातळीवर मराठी भाषेचा वापर वाढवण्यासाठी खास प्रयत्न करावे, विद्यापीठांनी मराठी माध्यम वापराचा कालबद्ध कार्यक्रम आखून तो अमलात आणावा व मराठीतून ग्रंथनिर्मितीस मदत करावी आदी मागण्यांचा प्रचार करून शासन व विद्यापीठांशी संवाद, चर्चा आणि जरूरीप्रमाणे आंदोलने संघटित करावी.

जग बदल घालुनी घाव । सांगुन गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात । रुतून बसला का ऐरावत
अंग झाडुनी निघ बाहेरी । घे बिनीवरती घाव
धनवंतांनी अखंड पिळले, धर्मांधांनी तसेच छळले
मगराने जणू माणिक गिळले, चोर जाहले साव ।
ठरवून आम्हां हीन कलंकित । जन्मोजन्मी करूनी अंकित
जिणे लादुनी वर अवमानित । निर्मून हा भेदभाव
एकजुटीच्या या रथावरती । आरुढ होऊनी चल वा पुढती
जग बदल घालुनी घाव, सांगुन गेले मला भीमराव ।।

- अण्णाभाऊ साठे

२. भाषा शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची, चाल मात्र अभिजनांची मक्तेदारी राखण्याची !

भारतीय शासनाने १९९१ पासून खाजगीकरण, खुलीकरण व जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले. शिक्षणसंस्था काढणे हा धंदा व शिक्षण ही क्रयवस्तू बनवली. जनसामान्यांना शिक्षणाची दारे बंद होऊ लागली. महाविद्यालये व विद्यापीठामध्ये प्रचंड फी वाढ करून जनतेच्या पैशातून आणि अनेक प्राध्यापक-संशोधक यांच्या योगदानातून उभ्या राहिलेल्या या संस्था धनिकांच्या मक्तेदारी अड्डा बनतील अशी व्यवस्था केली जाऊ लागली. असे शिक्षण क्षेत्रातील सार्वजनिक मालमत्तेवर डाका मारण्याचे धोरण खुलीकरणाच्या नावाखाली शासन लादत आहे. शिक्षणाचे व्यापारीकरण व खाजगीकरण करत शिक्षण खर्च बहुजनांच्या आवाक्याबाहेर नेऊन शिक्षणावर अभिजन्यांची मक्तेदारी कायम राखत, भाषा मात्र शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची करत २००९ साली केंद्र शासनाने शिक्षण हक्क कायदा पारित केला.

शिक्षण हक्क कायदा : १ एप्रिल २०१० पासून महाराष्ट्रामध्ये शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्याचा कथित हेतू सर्व बालकांना शिक्षणसंधी उपलब्ध व्हावी असा आहे. त्यादृष्टीने शासनाच्या अखत्यारीखालील जिल्हा परिषदा व नगरपालिका, महानगरपालिका चालवत असलेल्या शाळांवर मोठी जबाबदारी येते. या शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून मुलांना व पालकांना या शाळांमध्ये प्रवेश घ्यावासा वाटला पाहिजे, यासाठी प्रयत्न करण्याऐवजी विद्यार्थी संख्या घटत आहे म्हणून शाळा बंद करण्यात येत आहेत. मुंबईमधील शाळांचे खाजगीकरण / कंपनीकरण करण्याचा महानगरपालिकेतील सत्ताधारी शिवसेना पक्षाने निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदा व नगरपालिकांच्या मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थीसंख्या घटत आहे आणि पालक खाजगी इंग्लिश माध्यमांच्या शाळांकडे खर्च परवडत नसताना धावत आहेत, त्यामध्ये लहान बालकांचे मोठे नुकसान होत आहे व पालक कर्जबाजारी होत आहेत. या प्रश्नी राज्य शासनाने लक्ष घालणे, ही शिक्षणाचे

सार्वत्रिकीकरण करण्याची शासनाची जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने गरजेचे आहे. त्यादृष्टीने शासनाने शिक्षणाचे स्वरूप बदलणे, गुणवत्ता सुधारणे व मराठी माध्यम कायम राखणे यासाठी पुढील प्रश्नांमध्ये लक्ष घालणे गरजेचे आहे.

(१) आजच्या शिक्षणाचे अमूर्त स्वरूप व त्यामुळे येणारी दुर्बोधता : दृष्टी, श्रवण, स्पर्श, वास, चव या पाच इंद्रियांच्या माध्यमातून मिळणाऱ्या कार्यानुभवातून मुले ज्ञान मिळवतात. हे मिळालेले ज्ञान भाषेच्या माध्यमातून मुले व्यक्त करतात. कडू चव अनुभवाविना समजूच शकणार नाही, या अनुभवविश्वातून मुलांचा विकास होतो. शाळेत मात्र त्यांच्यापुढे अचानक उभ्या ठाकतात अमूर्त गोष्टी : संख्या, अक्षरे, काळ, दिशा, इत्यादी संकल्पना भाषेच्या माध्यमातून त्यांच्याभोवती गर्दी करतात आणि कार्यानुभवाच्या अभावी हे ज्ञान ती आत्मसात करू शकत नाहीत. गणित, भाषा, विज्ञान या विषयात ती कच्चीच राहातात.

(२) पाठ्यपुस्तकांची अवघड भाषा : दुर्बोधता वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे तथाकथित शास्त्रशुद्ध शब्द वापरण्याबाबत दुराग्रह बाळवून केलेली संस्कृत शब्दांची भाऊगर्दी, त्यामुळे पुस्तकातले धडेच अनाकलनीय बनतात. उदाहरणार्थ, दहावीच्या विज्ञान पुस्तकातील 'अन्नाचा अपव्यय' हा धडा शिकवताना या एका धड्यातले १०७ शब्दाचे अर्थ विद्यार्थ्यांना समजले नाहीत असे विदारक सत्य समोर आल्याचे एक शिक्षिका लिहितात. काही दुर्बोध शब्द असे - अपव्यय, विघटन, अपरिपक्क, निभरण, प्रादूर्भाव, स्वाद, विक्रय, कक्ष, ऱ्हास, बुफे, इ. सहावीच्या सामान्य विज्ञानाच्या धड्यांमधील अनेक शब्दांचे उच्चार करणेही मुलांना जमत नाही. उदा. दीर्घिका, परिभ्रमण, अन्नग्रहण, स्वयंपोषी, घटपर्णी, उत्सर्जन, स्रोत, स्थायू, दूष्फेन, उत्कलनांक, अविद्राव्य, अपरिवर्तनीय, अनावर्ती, अन्योन्य, इ.

(३) अभ्यास विषयांची गर्दी : इयत्ता दुसरीला किती विषय असावेत? मराठी धड वाचता येत नाही, लिहिणे तर नाहीच जमत. पण पुस्तकांची भाऊगर्दी - भाषा, गणित, इंग्रजी, परिसर-विकास, संगीत, शारीरिक शिक्षण आणि तिसरीला मराठी भाषा, गणित, इंग्रजी, सामान्य विज्ञान, इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र, सातवीचा इतिहास इ.स. ८०० ते १६०० एवढ्या प्रदीर्घ काळाचा असून त्यामध्ये सनावळी आणि राजांच्या नावांची गर्दी आणि ती पाठ केलीच पाहिजे असे परीक्षेचे स्वरूप. तिसरीला 'मानवाचा इतिहास' या विषयाचा फार मोठा कालखंड, त्यातील स्थित्यंतरे व त्याचा अन्वयार्थ सर्वसामान्य मुलांच्या आकलनाबाहेरचा ठरतो. तसेच नागरिकशास्त्र समजण्यासाठीही

शासन, प्रशासन अशा गुंतागुंतीच्या संकल्पना मुलांपर्यंत पोचणे कठीण जाते.

(४) शिक्षण म्हणजे माहितीचे ओझे : शालेय शिक्षणातून खरे तर माहितीचे ओझे लादण्याचे काहीच कारण नाही. मुलांची कुतुहूल व चौकस वृत्ती, आकलन व विचारशक्ती, सौंदर्यदृष्टी, सर्जनशीलता विकसित व्हावी, कसबी हात, निकोप सुहृढता, सहृदता, सचोटी-मेहनती वृत्ती जोपासणे, ज्ञानाची ओढ, स्वयंशिक्षण व स्वयंशिस्तीची आवड निर्माण व्हावी हे शिक्षणाचे उद्दिष्ट. परंतु चालू शिक्षणाचा केंद्रबिंदू म्हणजे पाठ्यपुस्तके व त्यातील माहिती पाठ करून उत्तरे देणे म्हणजे शिक्षण असे समीकरण बनलेले आहे. पुस्तके व वह्यांची गर्दी, चाचणीची टांगती तलवार, परीक्षा पार पडण्यासाठी गाईड्स नि क्लासच्या कुबड्या याखाली मुले भरडली जात आहेत. खरे तर पाठ्यपुस्तकी ज्ञान हे काही साध्य नाही तर ते शिक्षणामधले एक साधन आहे. त्याबरोबर कितीतरी निरनिराळी किंबहुना पुस्तकापेक्षाही अधिक महत्वाची म्हणजे प्रत्यक्ष कार्यानुभव देणारी साधने शिक्षणासाठी वापरणे अगत्याचे आहे. खेळ, गाणी, हस्तकला, परिसर निरीक्षण, विज्ञान प्रयोग, खेळणी, गोष्टी या सर्वांतून मुलांचे चौफेर शिक्षण हसतखेळत होऊ शकते. त्यात मुले रमली तर दंगाधोपा, बेशिस्तपणा याला आपोआप आळा बसतो. अवघडत बाकावर बसून, दुर्बोध धड्यांचे पठण करायचे, चुकले तर शिक्षा आणि धड शिकत नाही, म्हणून घरी रपाटे यातून मुले निराश होतात, व्रात्य होतात आणि शाळेत मागे पडतात ती पडतातच. हे प्रश्न लक्षात घेऊन शाळेतील अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके आणि शिकवण्याची पद्धत व परीक्षापद्धती या सर्वात आमूलाग्र बदल करणे हे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी आवश्यक आहे. आजच्या शिक्षणाचे उद्दिष्ट ज्ञानार्जन, विवेकबुद्धी, विचारशक्ती, सामाजिक जाणिवा प्रगल्भ होणे असे नसून घोकंपट्टीच्या जोरावर परीक्षा उत्तीर्ण होणे एवढेच बनले आहे. असा दावा केला जातो की ज्ञानाचा पसारा एवढा वाढतो आहे की शाळेतील माहिती व विषयांचे ओझे वाढवणे अपरिहार्य आहे. पण हा युक्तिवाद फसवा आहे. अखेर माहितीसाठी हजारो पुस्तके व आता इंटरनेटही उपलब्ध आहे. माहितीची चिकित्सक छाननी करून उपयोग कसा करायचा, विश्लेषण कसे करायचे, निष्कर्ष कसे काढायचे या आकलनासाठी शालेय शिक्षणात माहितीचे ओझे लादण्याचे काहीच कारण नाही. प्राथमिक शाळेत गणित, मातृभाषा, परिसर विज्ञान, कला, खेळ, या विषयांच्या शिक्षणाचा पाया स्वभाषेच्या सहजसुलभ माध्यमातून जर पक्का झाला तर माध्यमिक शाळेत अन्य भाषा शिकणे - उदा. इंग्रजी, संस्कृत, अरेबिक, रशियन, इ., सामान्य ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे, गणित व

विज्ञान शिक्षणाची खोली वाढवणे, कला - क्रीडा आविष्कार समृद्ध करणे शक्य होईल आणि उच्च शिक्षणामधून विशेषज्ञ तयार होतील. तेही केवळ पुस्तकी शिक्षण न देता अनुभव व व्यवहार ज्ञान याची सांगड घालून केले तर ते शिक्षण आशयघन होईल.

(५) मराठी भाषेवर प्रभुत्वाची निकड : आजच्या शिक्षणातील मुख्य अडचण म्हणजे शालेय शिक्षणाच्या प्रारंभीच्या काळात मराठी भाषेवर प्रभुत्व प्रस्थापित न झाल्याने मुले शिक्षणात मागे राहातात. मराठी भाषा मुलांना बोलता येतेच तेव्हा अक्षरओळख केल्यावर ती वाचता यावी, वाचलेले समजावे असे गृहीत धरले जाते. परंतु अनेक मुलांना कानामात्रेसह सबंध अक्षर व सबंध शब्द, विशेषतः जोडाक्षरे वाचण्याचे कसब चटकन् आत्मसात होत नाही. न अडखळता सरळ वाचन व स्पष्ट उच्चार पक्के झाल्याविनाच लेखनाचे धडे सुरू होतात व त्यामुळे लिहिताना तर अधिकच चुका होतात, वेग अगदी कमी पडतो आणि या धडपडीत अर्थबोध फारसा होत नाही, त्यामुळे घोकंपट्टीचा मार्ग स्वीकारला जातो. एवढा वेळ व शक्ती वाया दवडून तिसरीत गेली तरी मुलांना धड वाचता येत नाही. मराठी भाषा शिक्षणाचा पायाच कच्चा राहिल्याने शैक्षणिक प्रगती खुंटते.

ही समस्या लक्षात घेऊन भाषेवरचे प्रभुत्व यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. यासाठी पहिलीमध्ये तीन चर्तुथांश वेळ हा मराठी भाषाज्ञान पक्के करून घेण्यासाठी दिला पाहिजे. भाषेचे शिक्षण पुस्तकी पद्धतीने न देता. खेळ, चित्रकला, हस्तकला, कविता, असे क्रियाशीलतेद्वारा दिले पाहिजे. यामध्ये मुलांना गोडी वाटून भाषा आत्मसात होईल. दुसऱ्या वर्षी लेखनाचे शिक्षण असेच रंजकरित्या देऊन सुवाच्च अक्षर, शुद्धलेखन पक्के केले पाहिजे. तिसरीपर्यंत ७०% वेळ रंजक पद्धतीने भाषेचे कसब मिळवण्यासाठी, १५% वेळ अंकगणिताची तोंड ओळख व १५% वेळ कवायत, गाणी यासाठी ठेवला तर शाळेची गोडी निर्माण करत भाषेचा पाया पक्का होईल. तिसरीमध्ये निसर्ग विज्ञान, परिसर ओळख, आणि भाषा व गणित याची पायाभूत तयारी पूर्ण केली पाहिजे. मुलांना जमेल त्याप्रमाणे वाचण्यासाठी पुस्तके उपलब्ध करून द्यावी. पण अभ्यास व परीक्षाविषय म्हणून नाही, तर हौसेने वाचण्यासाठी. चवथीमध्ये परिसर भूगोल आणि निरीक्षण, प्रयोगाद्वारा विज्ञान अशा विषयांचा परिचय अमूर्त पद्धतीने नाही तर प्रत्यक्ष अनुभवून, निरीक्षणातून पोचवावा. मुले ९/१० वर्षाची झाली की अनुभवामुळे त्यांची आकलनशक्ती व अमूर्तकल्पना समजण्याची कुवत वाढलेली असते. अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याची तयारी झालेली असते. या काळातही पाठ्यपुस्तके, त्यावरील प्रश्न असे शिक्षणाचे एकसुरी स्वरूप न ठेवता, आणि

माहितीचे ओझे न लादता चौफेर वाचन, निरीक्षण, प्रयोग, कोडी यावर भर देऊन विविध विषयांची कवाडे उघडत जावी. परिक्षेचे ओझे न लादता मधून चाचणी घेऊन मागे पडत असतील त्या मुलांना खास लक्ष देऊन त्यांची प्रगती साधावी.

आजची अधिकृत मराठी बहुजनांतील अनेक मुलांना परकी वाटत असल्याने अभिजनांची प्रमाण* मराठी नको तर सत्तास्थानी असलेली इंग्रजीच हवी अशी भावना दृढ बनत आहे. इंग्लिश माध्यमातून शिक्षण घेणे हे प्रमाण मराठीतून शिक्षण घेण्यापेक्षा कितीतरी कठीण आहे. पण मराठी शिकवण्याची आजची पद्धत व मराठी पाठ्यपुस्तकांची भाषाही परकी वाटणार नाही या दृष्टीने निश्चित प्रयत्न करणे गरजेचे आहे. आज पाठ्यपुस्तकात वापरलेली भाषा कोणाचीच भाषा नाही आहे आणि ती पुस्तके सर्वांनाच दुर्बोध व कंटाळवाणी वाटतात. तेव्हा आज गरज आहे ती क्रमिक पुस्तकांमधील मजकूर अचूक करण्याची, त्यातील मांडणी रसपूर्ण शैलीत करण्याची, त्यातील परिभाषा सुधारण्याची आणि पाठ्यपुस्तककेंद्री शिक्षण पद्धत बदलून ती संवाद, प्रयोग, निरीक्षण, पूरक गोष्टी, वाचन आधारित करण्याची. परिभाषा कोशांमध्ये विविध बोलींमधील समुचित शब्द, कारागीर, शेतकरी, मच्छीमार आदींच्या वापरातले शब्द, अन्य भाषांमधील रुळलेले आणि नवे अर्थवाही शब्द जरुरीप्रमाणे समाविष्ट करणे गरजेचे आहे. अशा लवचीक दृष्टिकोनातून, पर्यायी शब्दांसह परिभाषा कोशांची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. पाठ्यपुस्तके ही 'प्रमाण' भाषेत नसावी, ती समाईक मराठीत** असावी, सर्व महाराष्ट्रासाठी एकच एक साचेबंद पद्धतीने न करता प्रादेशिक पातळीवरील भाषिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन विविधता लक्षात घेऊन त्यामध्येही लवचीकता आणावयास हवी.

बोली भिन्न असेल तर समाईक मराठीकडे क्रमशः स्थित्तंतर करणे गरजेचे आहे. कारण आदिवासी, ग्रामीण, दलित-पीडित समाजातील मुलांनी बालपणापासून आत्मसात केलेली बोली ही समाईक मराठीपेक्षा काहीशी भिन्न असते. पाठ्यपुस्तकांची अधिकृत मराठी भाषा तर शास्त्रशुद्ध शब्दांचा आग्रह धरल्यामुळे कृत्रिम व क्लिष्ट बनवलेली असल्याने ती आत्मसात करणे अधिकच कठीण जाते. तेव्हा ज्यांची बोलीभाषा समाईक मराठीहून भिन्न आहे अशा

---

* राज्य शासनाद्वारा निर्माण केलेल्या परिभाषा कोशातील पारिभाषिक शब्दांचा वापर केलेल्या लिखाणाची भाषा ही **प्रमाण** किंवा ''अधिकृत'' मराठी.

** विदर्भ, कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र येथील शिक्षित जनतेला परिचित असलेली, महाराष्ट्रातील विविध प्रांतातून प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांमध्ये वापरात असलेली भाषा ही **समाईक मराठी.**

मुलांसाठी पहिलीत बोलीतील शब्द वापरून दुसरी – तिसरीपर्यंत समाईक मराठीकडे स्थित्यंतर करावे. यासाठी शिक्षकांना त्या त्या बोली अवगत असणे गरजेचे आहे.

६) इंग्रजी भाषा शिक्षण : जागतिकीकरणाच्या जमान्यामुळे इंग्रजी फाडफाड बोलता आल्याशिवाय पाल्यांना भवितव्य नाही आणि त्यासाठी मध्यमवर्गीयांप्रमाणे बालपणापासून इंग्रजी माध्यमातच शिक्षण घेतले पाहिजे असा भ्रम भारतातील बहुजनसमाजात खोलवर रुजला आहे. त्यासाठी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव फुटले आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवण्याचा ध्यास घेऊन जर बालवाडीपासून इंग्रजी माध्यम स्वीकारले व त्यात प्रगती करणे जमले तर स्वभाषेपासून मुले तोडली जातात. आज भारतात मध्यम वर्गामध्ये हेच घडलेले दिसते. त्यांना मराठी बोलता येते एवढेच. पण वृत्तपत्रे, मासिके, नाटके यात रस नाही. मराठीबाबत तुच्छताभाव, इंग्रजीची प्रौढी, अमेरिकनांचे अंधानुकरण करण्याची गुलामी वृत्ती, असे स्वत्व गमावलेले केवळ करिअर/ पैसा एवढेच श्रेय मानणारे परात्म सेवक, अभियंते, व्यवस्थापक बनत आहेत. घरामध्ये लिखापढीचे वातावरण व आर्थिक अनुकूलता नसेल व इंग्रजी कच्चे राहिले तर सर्वच विषय कच्चे राहतात, आणि शिक्षणाचा एकूणच खेळखंडोबा होतो. स्वभाषा हेच शिक्षणाचे स्वाभाविक व समुचित माध्यम आहे, हे वैज्ञानिक व अनुभवजन्य सत्य जाणतात असे काही सामाजिक कार्यकर्ते द्विभाषा समृद्धी प्रकल्प राबवत आहेत. त्यामध्ये बालवाडी व पहिलीत १० टक्के वेळ इंग्रजीसाठी व दुसरी ते सहावी ५० टक्के वेळ इंग्रजीसाठी देऊन, मराठी व इंग्रजी दोन्ही भाषा शिकवल्या जातात, माध्यम मात्र मराठी असते. परंतु इंग्रजी भाषेचे शिक्षण जर बालवयात सुरू केले तर भारतीय समाजामध्ये इंग्रजीला एवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे की मुलांमध्ये मराठीबाबत तुच्छताभाव निर्माण होऊन मराठी भाषा शिक्षणाबाबत उदासीनता / दुर्लक्ष निर्माण होण्याचा धोका असतो. असे दुर्लक्ष होऊन जर प्राथमिक शाळेमध्ये मराठी भाषा चांगल्या प्रकारे अवगत झाली नाही तर पुढील शैक्षणिक प्रगतीत अडचणी येतात. दुसरी अडचण, इंग्रजीवर प्रभुत्व असलेले आणि लहान मुलांमध्ये इंग्रजीबाबत अहंगड निर्माण होऊ नये अशा समुचित पद्धतीने ती परकी भाषा शिकवण्याचे कसब असलेले शिक्षक पुरेशा संख्येने उपलब्ध नसतील तर द्विभाषा समृद्धी ऐवजी शिक्षणाचा एकूणच विचका होणे संभवते.

अलिकडील मज्जाशास्त्रीय संशाधनातून असे आढळून आले की मातृभाषा (पहिली भाषा) ही साधारण १२ वर्षे वयापर्यंत वेगाने आत्मसात होते. दुसऱ्या भाषेच्या संदर्भात शास्त्रीय निष्कर्ष उपलब्ध नाहीत. परंतु अनुभवातून असे आढळते की मातृभाषेतून ज्यांचे चार-पाच वर्षे चांगले

शालेय शिक्षण झालेले आहे त्यांना किशोरवयात चार-पाच वर्षात सुयोग्य पद्धतीने शिकवल्यास इंग्रजी सहजी शिकता येते. परकी भाषेचे शिक्षण जर बालवयात सुरू केले तर बालवयामध्ये ऐकण्यावर, पाठांतरावर भर असल्याने प्रगती झाल्यासारखे भासते पण ती पोपटपंची ठरू शकते.

युनेस्कोने जगभराच्या विकासाच्या विविध टप्प्यांवरील १२ देशांमध्ये परकी भाषा शिकण्याबाबत अभ्यास करून पुढील निष्कर्ष काढले आहेत. (२००८)

किशोरवयात विचार करून, स्वतःची समज वापरून भाषा आत्मसात केली जाते. शब्दांचा वापर विचारपूर्वक केला जातो व नेमके शब्दोच्चार जमतात. तेव्हा इंग्लिश भाषा शिकण्याचा सोपा, स्वाभाविक, सरळ मार्ग म्हणजे इंग्लिश किंवा कोणत्याही परक्या भाषेचे शिक्षण १३/१४ वर्षे अशा किशोरवयात सुरू केल्यास प्रगती वेगाने होऊ शकते. स्वभाषेवर प्रभुत्व मिळवताना ध्वनीरूप संकेताचे अर्थामध्ये रुपांतर करण्याचे कसब विकसित होते. शब्दोच्चार, वाचन, लिखाण, शब्दभंडार, अर्थछटा, भाषेची लकब, रचना, व्याकरण, अभिव्यक्ती कौशल्य प्रगल्भ झालेले असते. भाषा कौशल्य व ज्ञान भांडाराचा विस्तार हातात हात घालून झालेला असतो. त्यामुळे परकी भाषा शिकणे हे मूळ स्वभाषेच्या माध्यमाद्वारा पैदा केलेले ज्ञान अन्य भाषेत रुपांतरित करणे एवढेच साधायचे असते. त्यामुळे ही क्रिया झपाट्याने होते.

मातृभाषा चांगली अवगत होऊन त्यामुळे आकलनशक्ती प्रगल्भ झाल्यावर साधारणपणे किशोरवयात किंवा त्यानंतर, कोणतीही परकी भाषा ४०० ते ५०० तासामध्ये गरजेप्रमाणे शिकता येते. याचा अर्थ चार शैक्षणिक वर्षांमध्ये दरवर्षी १०० तास म्हणजे दर आठवड्यास ३ ते ४ तास किंवा दोन वर्षाच्या सायंकालीन अभ्यासक्रमाद्वारे दर आवड्यात रोज दोन तास, किंवा तीन महिन्याच्या खास अभ्यासक्रमाद्वारे दररोज पाच तास, उत्तम प्रशिक्षित शिक्षकांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने भाषा शिकवली तर परकी भाषाज्ञान कमावता येते. वाचनाच्या सरावातून तिच्यावर प्रभुत्वही मिळवता येते. अखेर परकी भाषा हे साधन आहे. जरुरीप्रमाणे हे साधन आत्मसात करणे हे किशोरवयापासून सहजसुलभ असते. परंतु बालवयात भाषा आत्मसात न होता यांत्रिक पद्धतीने लादली तर ते ओझेच बनते. त्यामुळे वेळेचा, बुद्धीचा, श्रमांचा अपव्ययच होतो. भाषा अवगत नसताना ती माध्यम म्हणून लादली तर सर्वच विषय कच्चे राहून शिक्षणाचा खेळखंडोबा होतो.

इंग्रजी किंवा कोणतीही परकी भाषा शिकवताना ती काय पद्धतीने शिकवली जाते हे महत्त्वाचे आहे. लहान मुले घरातून, परिसरातून भाषा शिकतात, घरात हिंदी व परिसरात मराठी असेल

तर दोन्ही भाषा आत्मसात करू शकतात. परप्रांतात गेल्यावर सतत संपर्कामुळे तेथील स्थानिक भाषा समजू लागते. परकी भाषा शिकण्याचा समुचित मार्ग म्हणजे रोज वापरात असलेल्या इंग्रजी भाषेतील शब्दांपासून प्रारंभ करून, सोपी वाक्ये बोलण्याचा, कवितांचा सराव करत शब्दसंपत्ती वाढवत वाक्यरचना आत्मसात झाल्यावर व्याकरणाचा परिचय, लिपी व लिहिण्याची सवय असा शिक्षणक्रम वापरल्यास प्रगती सुकर होते. शब्दसंपत्ती वाढण्यासाठी वाचन आणि संभाषणाचा सराव ठेवणे गरजेचे आहे. भाषा ज्ञान व शिकवण्याची पद्धत याबाबत शिक्षकांच्या गुणवत्तेवर शिक्षणाचा दर्जा अवलंबून असल्याने शिक्षकांना समुचित प्रशिक्षण देणे महत्त्वाचे.

स्वातंत्र्यानंतर ६७ वर्षे झाली तरी भारतातली निम्मी जनता अर्धशिक्षित आहे. आरक्षणे सोडली तर बहुजन समाजातील बहुसंख्य जनता उच्च शिक्षणापासून वंचित आहे. संशोधन पातळीवरही मूलभूत संशोधन, जनोपयोगी कल्पक संशोधन विरळाच. शिक्षणआयोग झाले, कोठारी आयोगासारख्या आयोगाने काही मूलभूत शिफारशी केल्या पण शिक्षण पद्धतीमध्ये पायाभूत बदल झालेले नाहीत. इष्ट बदल कसे करावे यासाठी जगभरचे अनुभव आपणापुढे आहेत, तरीही ते प्रत्यक्षात अवलंबले जात नाहीत. इंग्लिश ही राजभाषा म्हणून कायम राखलेली आहे. परक्या भाषेच्या कुबड्या बाळगल्यामुळे विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन पातळीवरही सर्जनशीलता विरळाच. अमेरिका-इंग्लंडचे अंधानुकरणच सर्रास आढळते. हे अंधानुकरण व इंग्लिश भाषेवरील परावलंबन सोडून भारतीय भाषांचे संवर्धन करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावयास हवा. मराठी भाषेचा वापर सार्वत्रिक 'सर्व पातळीवरील शिक्षण, प्रशासन, न्यायदान, अर्थव्यवहार', करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे व इंग्रजी माध्यमाचा प्रसार थोपवला पाहिजे. शासनाच्या अखत्यारीखालील शाळांमधून स्वभाषेतून, गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. सर्व जनतेला विकासास वाव मिळावा यासाठी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची जबाबदारी शासनाने स्वीकारून वर सुचवल्याप्रमाणे शालेय शिक्षणाचे स्वरूप व शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल घडवावयास हवेत. तरच शिक्षणाचे खरे खुरे सार्वत्रिकीकरण शक्य होईल.

अत्त : दीप : भव

स्वयम् प्रकाशित व्हा !

३. विविध नोकरी-व्यवसायांसाठी लागणारी "इंग्रजी" भाषेची क्षमता

अनेक नोकरी - पेशांमध्ये इंग्रजी भाषेत व्यावहारिक संभाषण करण्याचे कसब गरजेचे असते. कोणतीही भाषा बोलायची तर त्याचा सराव हवा. काही नोकऱ्यांमध्ये उदा. सुरक्षारक्षकांचे प्रशिक्षण भरती करणाऱ्या संस्थाच करतात. काही नोकऱ्यांमध्ये उदा. मॉल्स भरतीनंतर प्रशिक्षण दिले जाते. आपण जी नोकरी शोधत असतो त्या नोकरीसाठी लागणारे कसब क्लासला जाऊन २/३ महिन्यात आत्मसात करता येते. शाळेमध्ये इंग्रजी भाषेचा परिचय झालेला असतो. त्यामुळे संभाषण कौशल्य अल्पकाळात शिकता येते. त्याचा सराव मात्र मित्रांशी इंग्रजीत बोलत राहून चालू ठेवणे मदतकारक होते. त्याला वाचनाची जोड दिली तर शब्दसामग्री वाढून आत्मविश्वास वाढतो. खरे तर, माध्यमिक शाळेत योग्य पद्धतीने इंग्रजी भाषा शिकवली तर गरजेएवढे इंग्रजी भाषा कौशल्य सहज आत्मसात करता येते. पण ते शिक्षण समाधानकारक नसेल तर जरूर ते कौशल्य क्लासला जाऊन कमावता येते. तेव्हा इंग्रजीचे अवडंबर माजवून मुलांच्या डोक्यावर बालपणापासून इंग्रजी माध्यमात शिकण्याची सक्ती लादून स्वभाषेतून शिकत राहण्याची नैसर्गिक ऊर्मी मारून मुलांची बौद्धिक व मानसिक पिळवणूक करू नये.

ज्या नोकरी पेशांमध्ये पदवी शिक्षण गरजेचे असते अशा खाजगी व सरकारी क्षेत्रामधील कचेऱ्या, शिक्षण संस्था, कारखाने; बँका, आदीत नोकरी करणारे अधिकारी, व्यवस्थापक, अभियंते, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आदी आणि वकील, डॉक्टर, वास्तुशिल्पी आदी व्यावसायिक यांना आज इंग्रजी भाषा ज्ञान आवश्यक असते. पदवी शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्याने त्यांनी आवश्यक तेवढे कसब आत्मसात केलेले असते. प्रत्यक्ष नोकरीकाळात गरजेप्रमाणे ते वाढवणे शक्य होते. महाविद्यालयीन शिक्षणात इंग्रजी ऐवजी मराठी माध्यम आणि वरील सर्व व्यवहारांमध्ये क्रमशः मराठीचा वापर या मागण्यांचा आग्रह धरणे गरजेचे आहे. वेगवेगळे व्यवसाय आणि नोकऱ्या यासाठी लागणारी इंग्रजी भाषिक क्षमता याचा आढावा पुढे घेतला आहे. त्यामध्ये उच्चपदे विचारात घेतलेली नाहीत.

१. सरकारी नोकरी, सार्वजनिक क्षेत्रातील पोस्ट, रेल्वे, गोदी, बस सेवा, म्युनिसिपल सेवा, वीजवितरण वगैरे : येथे नोकरीसाठीचा अर्ज मराठी भाषेतून वा हिंदीतून करता येतो. नोकरीतील कामाशी संलग्नित इंग्रजी वाचन सोडून इंग्रजीची गरज नसते. अजूनही प्रशासनाने मराठीचा पूर्णपणे अवलंब केलेला नाही. ती मागणी करणे गरजेचे आहे.

२. विविध प्रकारचे कसब आधारित स्वयंरोजगार किंवा नोकरी : बांधकाम, लाद्या बसवणे, प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, सुतारकाम, फर्निचर बनवणे, मेकॅनिक अशा अनेक प्रकारच्या कसब आधारित श्रमाच्या कामांमधील कसबी कारागीर नोकरी करतात किंवा स्वयंरोजगार मिळवतात. या कामांकरिता आज रु. ५०० ते १००० रोज एवढी मिळकत लहानमोठ्या शहरांमध्ये होते. ह्या पैकी कोणत्याही कसबी कारागिराला इंग्रजी येण्याची गरज नसते.

३. दुकानदारी, व्यापार : किराणा मालापासून ते फर्निचरच्या दुकानापर्यंत कोठेही विक्रेते/ साहाय्यक म्हणून काम करणाऱ्यांना ग्राहकांची भाषा येणे हेच महत्त्वाचे. अशा पारंपारिक दुकानांमध्ये इंग्रजी येण्याची अट नसते.

४. सुरक्षा रक्षक : यासाठी कामाशी संलग्न असे इंग्रजी वाचन, सोप्या प्रश्नांना इंग्रजी वा हिंदीत उत्तरे देणे, हे कसब लागते ते भरती करणाऱ्या संस्थाच देतात.

५. कुरियर व तत्सम सेवा : पत्ते, सोपे इंग्रजी वाचणे अशा प्रकारचे कसब लागते.

६. टॅक्सी/बस ड्रायव्हर : माहिती तंत्रज्ञान, त्यावर आधारित उद्योग, इतर उत्पादन उद्योग, पंचतारांकित पर्यटन यामध्ये जेथे परदेशियांची वाहतूक करावयाची असते त्या टॅक्सी / बस ड्रायव्हर यांना ग्राहकाने विचारलेल्या सोप्या प्रश्नांना इंग्रजीत उत्तरे देणे, छापील इंग्रजी नावे, पत्ते वाचता येणे एवढे कसब असणे आवश्यक असते. या व्यवसायातील अन्य व्यवहार हे स्थानिक वा हिंदी भाषेतूनच चालतात. सर्वसामान्य टॅक्सी / बस / ट्रक / रिक्षा ड्रायव्हर यांना इंग्रजीची गरज नसते.

७. मॉल्स, मल्टिप्लेक्स, ब्रँडेड वस्तू, उपकरणे, कपडे इ. दुकाने : यात ग्राहकसेवा, विक्री यांसारखी कामे करणाऱ्या तरुण/तरुणींना ग्राहकाने विचारलेल्या सोप्या प्रश्नांना इंग्रजी वा हिंदीत उत्तरे देणे, मार्गदर्शन करणे, सोपे, छापील इंग्रजी वाचता येणे एवढे कसब असणे अपेक्षित असते. आवश्यक इंग्रजीचे प्रशिक्षण नोकरीच्या सुरुवातीच्या काळात दिले जाते.

८. हॉटेल व्यवसाय : पंचतारांकित हॉटेलांमध्येच फक्त ग्राहकांकडून 'ऑर्डर' घेण्याचे काम करणाऱ्यांना सोपे इंग्रजी-वाचन, लिखाण, संभाषण-येण्याची आवश्यकता असते.

इतर सर्व कर्मचारी वर्गातील लोकांचा व्यवहार हा स्थानिक वा हिंदी भाषेतूनच चालतो. सर्वसामान्य हॉटेल / उपहारगृहात इंग्रजीची गरज नसते.

९. शेतीसंलग्न खते, कीटकनाशके, अवजारे विक्री : यासाठी ग्राहकाची भाषा म्हणजेच स्थानिक भाषा अवगत असणे आवश्यक असते. इंग्रजी वाचणे गरजेचे असते कारण कंपन्या सर्व साहित्य इंग्रजीत काढतात. हे साहित्य स्थानिक भाषेतून तयार केले पाहिजे.

१०. औषध विक्री दुकानांतील साहाय्यक : डॉक्टरचे प्रिस्क्रिप्शन वाचणे, औषधांची नावे वाचता येणे, यापुरते इंग्रजी आवश्यक असते.

११. नर्सिंग व आरोग्य व्यवस्थेशी संलग्न संधी : येथे इंग्रजीचेच प्राबल्य आहे. यात व्यावसायिक गरजेशी निगडित सर्व साहित्य, औषधे ह्यांची नावे इंग्रजीत, सर्व रिपोर्टस् इंग्रजीत लिहिण्याची प्रथा असल्याने इंग्रजीचे ज्ञान गरजेचे असते. त्या त्या प्रशिक्षणाचा भाग म्हणून हे ज्ञान दिले जाते. इंग्रजीतून संभाषण लागत नाही. ते स्थानिक वा हिंदीतूनच चालते.

१२. विविध उत्पादन उद्योग : १. कामगारांसाठीची सूचनापत्रे आज इंग्रजीत असतात. परंतु ही स्थानिक भाषेत असली पाहिजेत. खाजगी उद्योगांमध्ये कामगार पदाच्या नोकरीसाठी आज विनाकारण इंग्रजीत अर्ज अपेक्षित केले जातात. मराठी-हिंदी अर्ज स्वीकारले पाहिजेत. २. सुपरवायझर, फोरमन, अभियंता ही सर्व मंडळी स्थानिक भाषेचा वापर दैनंदिन कामात मुख्यत्वे करत असतात. फक्त रिपोर्टिंगसाठी इंग्रजी वापरतात. त्यासाठीही मराठी वापरले पाहिजे.

१३. शिक्षक : इंग्रजी भाषेचे शिक्षक सोडून इतरांना इंग्रजी येणे गरजेचे नाही.

१४. कॉल सेंटर वगैरे : १. यात दोन प्रकारच्या संधी, एक 'व्हॉईस' आणि दुसरे 'डाटा' सर्विसेस. पैकी 'व्हॉईस' सर्विसमध्ये 'भाषा' हेच मुख्य कसब परंतु ती इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, जपानी, चिनी अशी कुठलीही असू शकते. म्हणजे इंग्रजीखेरीज इतर भाषेत काम करायचे असेल तर ती भाषा शिकावीच लागते. २. 'डाटा' सर्विसमध्ये इंग्रजीचा वापर प्रामुख्याने केला जातो, त्यासाठी इंग्रजी भाषाज्ञान आवश्यक.

१५. माहिती तंत्रज्ञान (आय. टी.) : अर्ज करण्यापासून ते रोजच्या कामकाजात प्रामुख्याने इंग्रजीचा वापर मोठ्या प्रमाणात करावा लागतो. या व्यवसायात शिरकाव करणाऱ्यांत मुख्यत्वे अभियांत्रिकी, विज्ञान, कॉमर्स वगैरे शाखांतील पदवीधर असतात. ३/४ वर्षांच्या शिक्षण काळात त्यांनी आवश्यक तेवढे इंग्रजी भाषाज्ञान आत्मसात केलेले असते.

शिक्षण
सद्यस्थिती आणि पर्याय

" शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा "
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

हा युगमंत्र
अमलात आणण्यासाठी
आजची गुलाम बनवणारी शिक्षणव्यवस्था
बदललीच पाहिजे!

इंग्रजी माध्यमाची गुलामगिरी
झुगारलीच पाहिजे!!

नोकरी धंद्यासाठी इंग्रजीचे ज्ञान किती लागते आणि
ते कसे मिळवावे
हे समजून घेऊ या

वाचा

विचार करा आणि

संघर्षात सामील व्हा!!!

सहयोग मूल्य १०/- रुपये